# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ / श्रावण १७, १९३९ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | |
| **(२)** | **गृहनिर्माण मंत्री** | **यांचे प्रभारी** |
| **(३)** | **कामगार, कौशल्य विकास, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** | **विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ८८**

---

### वर्धा जिल्हयातील आर.बी.बी.ए.डागा कामगार सहकारी पतसंस्था मर्या. हिंगणघाट येथील कामगारांचे भाग-भांडवल परत मिळणेबाबत

**(१) * ८८४४७ श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्हयातील आर.बी.बी.ए.डागा कामगार सहकारी पतसंस्था मर्या. हिंगणघाट, र.न.१०८ येथील कामगारांचे सन २००९ पासून भाग-भांडवल परत न मिळाल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (हिंगणघाट) यांनी निवेदन देऊन भाग-भांडवल मिळण्याकरीता विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने निर्णय घेतला आहे काय, असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, तद्नुसार शासनाने भाग-भांडवल कामगारांना परत मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय, खरे आहे.

(२) व (३) सदर पतसंस्था अवसायनात असून सभासदांच्या भागभांडवलाचे मुल्य ऋण (-) असल्याने सभासदांचे भागभांडवल परत करण्यात येऊ नये, असे अभिप्राय संस्थेच्या २०१०-१२ च्या लेखापरिक्षण अहवालात नमूद करण्यात आलेले आहेत. असे असले तरी संस्थेस झालेल्या आर्थिक नुकसानाची जबाबदारी निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ अन्वये चौकशी करण्याबाबतचे आदेश सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, हिंगणघाट यांनी दि.२२/५/२०१५ रोजी दिले. सदर आदेशाच्या विरोधात संबंधितांनी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचेकडे अपिल दाखल केले होते. विभागीय सहनिबंधकांनी त्यांच्या दिनांक ३/१२/२०१६ च्या आदेशान्वये संबंधितांना दोषमुक्त केले आहे. सद्यस्थितीत संस्थेजवळ देणे देण्यासाठी कोणत्याही प्रकारची रक्कम शिल्लक नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर (ता.बागलान, जि.नाशिक) येथील कांदा उत्पादक शेतकऱ्यांची व्यापाऱ्याकडून फसवणुक झाल्याबाबत

**(२) * ८८३९३ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर (ता.बागलान, जि.नाशिक) येथे काद्यांची शिवार खरेदी करुन मोसम खोऱ्यातील १५० हून अधिक कांदा उत्पादक शेतकऱ्यांना सुमारे अडीच कोटी रुपयांहून अधिक रकमेचे धनादेश आणि जमा पावत्या देवून परराज्यातील व्यापारी फरार झाल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फसवणूक झालेल्या शेकडो शेतकऱ्यांनी जामखेडा पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने फसवणूक करणा-या व्यक्तीविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे व शेतकऱ्यांचे पैसे परत मिळण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) सदर प्रकरणी दयाने, ता. सटाणा तेथील एका शेतकऱ्याने त्याची व साक्षीदार यांची एकूण २४,२६,०७४/- रुपयांची फसवणूक केल्याबाबत फिर्याद दिल्याने जायखेडा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ८२/२०१७ भा.दं.वि. कलम ४२०,३४ प्रमाणे दि.०९/०५/२०१७ रोजी ४ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात आरोपी यांनी संगनमत करून फिर्यादी व साक्षीदार यांचा कांदा खरेदी करून रक्कम न देता फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी फरार असुन, त्यांचा शोध घेण्यावर गुन्हा तपासावर आहे.
(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## मीरा-भाईंदर महानगरपालिकेत नगररचनाकार पदावर कार्यरत असलेले दिलीप घेवारे यांच्या गैरव्यवहाराची चौकशी करणेबाबत

**(३) * ८८१४६ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा-भाईंदर महानगरपालिकेतील नगररचनाकार दिलीप घेवारे यांनी दुर्बल घटकांच्या घरांसाठी राखीव असलेली ८० लाख चौ.फूट जमिन ४४ हून अधिक बनावट दाखले देऊन विकास कामांचे बांधकाम आराखडे मंजूर करुन विकासकांना शासकीय जमिन देऊन केलेल्या युएलसी गैरव्यवहार प्रकरणी ठाणे पोलीसात गुन्हा दाखल होऊन १ वर्षाहून अधिक कालावधी लोटला तरीही त्यांच्या विरोधात चौकशीही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तात्पुरत्या प्रतिनियुक्तीवर मीरा-भाईंदर महानगरपालिकेत आलेल्या घेवारे यांची मुदत संपून वर्ष उलटले तरीही त्यांना अद्यापी मीरा-भाईंदर महानगरपालिकेत नगररचनाकार या पदावर ठेवण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मौजे भाईंदर येथील जुना सर्व्हे क्र.६६३ (नवीन सर्व्हे २३७) व जुना सर्व्हे ६६४ (नवीन सर्व्हे २३६) हा शासकीय भूखंड कमाल जमिन धारणा कायद्याखाली येत नसल्याचे प्रमाणपत्र विकासक श्यामसुंदर अग्रवाल व त्यांच्या साथीदारांनी दिलीप घेवारे यांच्याशी संगनमत करून मिळविला आणि त्याआधारे अकृषक परवानग्या व बांधकाम परवानग्या मिळवून अग्रवाल या विकासकाने सदरहू जागेवर टॉवर उभारल्यानंतर आजमितीस नागरी जमिन कमाल धारणा कायद्यानुसार शासनाला त्यातील एकही सदनिका हस्तांतरीत केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ठाणे नगर पोलीस ठाण्यात एफआयआर दाखल झाल्यानंतर या प्रकरणी अग्रवाल यांना अटक करण्यात आले पण त्यांना बांधकाम परवानगी देणारे दिलीप घेवारे यांच्याविरोधात आजमितीस कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हेही खरे आहे काय,

(५) असल्यास, घेवारे यांची वादग्रस्त कारकीर्द आणि संपलेली मुदत यांची दखल घेवून आयुक्त नरेश गिते यांनी त्यांना कोणत्याही कागदपत्रांवर सहया करू नका असे स्पष्ट आदेश मागील २ महिन्यांपासून दिल्यामुळे कागदोपत्री नगररचनाकार पदावर असलेल्या घेवारे यांना काम न करता वेतन मिळत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे दिलीप घेवारे यांच्याविरोधात कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ठाणे नगर पोलीस स्टेशन येथे श्री. मिलन मनसुखलाल गांधी, मुंबई यांनी प्रामुख्याने मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे भाईंदर येथील जूना सर्व्हे क्र. ६६३ (नविन सर्व्हे क्र २३७) व जूना सर्व्हे क्र. ६६४ (नविन सर्व्हे क्र. २३६) मधील क्षेत्रासाठी, श्री. श्यामसुंदर

अग्रवाल व इतर यांनी, नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ च्या तरतूदी लागू नसल्याबाबतचे प्रमाणपत्र तयार करुन त्याआधारे अकृषक परवानगी व बांधकाम परवानगी प्राप्त करुन, अधिनियमानूसार शासनास देय असलेले बांधिव क्षेत्र (सदनिका) न देता शासनाची फसवणूक केल्याच्या तक्रारीवरुन ठाणे नगर पोलीस स्टेशन, ता.जि. ठाणे येथे पहिली खबर (F.I.R.) क्र. आय/२०१/१६, दि. १०.११.२०१६ रोजी दाखल केला आहे.

प्रस्तुत प्रकरणी चौकशीअंती, सहायक पोलीस आयुक्त (प्रती.), गुन्हे शाखा, ठाणे शहर यांनी सदर प्रकरणातील ६ आरोपींपैकी ५ आरोपी श्री.श्यामसुंदर रा.अगरवाल, श्री.विश्वरुप उर्फ बबन शिवाजी पारकर, श्री.शैलेश शे.शहा, श्री.मनोज मो. पुरोहित, श्री.रतीलाल भ.जैन यांच्याविरोधात मा. विशेष न्यायालय ठाणे यांच्या न्यायालयात दि.३१.०३.२०१७ रोजी दोषारोप पत्र दाखल केले आहे.

तसेच सदर गुन्हयातील क्र.६ चे आरोपी श्री.भास्करराव यादवराव वानखेडे, तत्कालीन अपर जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, ठाणे नागरी समुह, ठाणे हे मयत असल्यामुळे यांच्याविरुध्द मा.न्यायालयात ॲबेटेड समरी पाठविण्यात आली आहे. सदर दोषारोप पत्रामध्ये श्री.दिलीप घेवारे यांच्या नावाचा समावेश नाही. सदर केसचा कोर्ट केस क्र.११/२०१६ आहे.

(२) श्री.दिलीप घेवारे, नगररचनाकार यांची दि.०६.०२.२०१६ पासून द्वितीय वर्षाकरिता मिरा भाईंदर महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली होती. सदरची मुदत दि.०५.०२.२०१७ रोजी संपुष्टात आली आहे. ही बाब विचारात घेऊन त्यांची विशेष भूमि संपादन अधिकारी, विशेष घटक क्र.३, पिंपरी, पुणे या कार्यालयात बदली करण्यास शासन मान्यता प्राप्त झाली होती. तथापि, जिल्हाधिकारी, पुणे यांनी उक्त कार्यालय तात्पुरत्या स्वरुपात बंद केले असल्याने, सदर आदेशाची अंमलबजावणी होऊ शकलेली नाही. त्यामुळे श्री.घेवारे यांची अन्य कार्यालयात रिक्त असलेल्या पदावर बदलीने पदस्थापना करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) व (४) विषयाधिन जागेवर आजमितीस कलम २० खालील योजना मंजूर नसल्याने सदनिका प्रत्यार्पित होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) हे खरे नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरात सिमेंट क्राँक्रीट रस्त्याचे आणि पुलाचे काम निकृष्ट होत असल्याबाबत

**(४) * ९२७२४ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात मागील दोन वर्षापासून सिमेंट क्राँक्रीट रस्त्याचे काम आणि पुलाचे बांधकाम सुरू असून या कामावर कोणत्याही अभियंताचे लक्ष नसल्यामुळे अनेक रस्त्यांची व पुलांची कामे निकृष्ट दर्जाची होत असून वर्षभरापुर्वी मानेवाडा बेसा रोडवर कंत्राटदारांनी तयार केलेल्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे पुलाजवळील भाग खचला असल्याची धक्कादायक माहिती दिनांक २८ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर शहरात या सिंमेट रस्त्याच्या कामामुळे परिसरातील अनेक नागरिकांच्या घरात पावसाचे पाणी शिरत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत अनेक नागरिकांनी व सामाजिक संस्थांनी तक्रार केली असतांनाही अद्‌यापही याबाबत चौकशी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करून संबधितावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

नागपूर महानगरपालिकेमार्फत सुरु असलेल्या सिमेंट रस्त्यांच्या कामांचे डिझाईन व्ही.एन.आय.टी. या नामांकित संस्थेकडून तयार करुन घेण्यात आले आहे.

तसेच या कामाची गुणवत्ता तपासणी व गुणवत्ता राखण्यासाठी, नॅशनल अॅक्रेडिएशन ब्युरो ऑफ लॅबरोटरीज कडून मान्यता प्राप्त असलेल्या व नागपूर शहरातील अग्रगण्य अशा मे.जीओटेक सर्व्हीसेस या संस्थेची नेमणूक करण्यात आलेली आहे.

त्याशिवाय या रस्त्याच्या कामावर महानगरपालिकेचे अभियंते, कंत्राटी पदवीधारक, पदविकाधारक अभियंते यांची पर्यवेक्षक म्हणून नेमणूक करण्यात आली असून, त्यांच्याकडून वेळोवेळी या रस्त्याच्या कामाबाबत पाहणी केली जाते.

दिनांक २७/०६/२०१७ रोजी झालेल्या अतिवृष्टीच्यावेळी नागपूर ग्रामीण तालुक्यातील मानेवाडा, बेसा रस्त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत बांधलेल्या पुलाच्या पोचमार्गाची कडा नाल्यातील अतिक्रमणामुळे बदललेल्या पुराच्या प्रवाहामुळे काही प्रमाणात क्षती झाली होती. तथापि, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सदर क्षती दुरुस्ती तात्काळ करण्यात आलेली आहे.

नागपूर शहरातील अंतर्गत वळण रस्त्याचे संकल्पन व्ही.एन.आय.टी. नागपूर या तज्ञ संस्थेमार्फत करण्यात आले आहे. या रस्त्याची पातळी तांत्रीक नियोजनात निश्चीत केल्यानुसार ठेवण्यात आली आहे.

त्रयस्थ संस्थेकडून करण्यात आलेल्या गुणवत्ता नियंत्रण तपासणीमध्ये या वळण रस्त्याचे काम योग्य दर्जाचे आढळून आलेले आहे.

(२) दिनांक २७ जून, २०१७ आणि दिनांक १७ जुलै, २०१७ रोजी झालेल्या मोठ्या पावसामुळे शहरातील कांही भागामध्ये पाणी साचले होते, ही बाब खरी आहे.

तथापि, सिमेंट रस्त्याच्या कामांमुळे नागरिकांच्या घरात पावसाचे पाणी गेले ही बाब खरी नाही.

(३), (४) व (५) कॉंक्रीट रस्त्यांची कामे ही निश्चीत करण्यात आलेल्या निकषानुसार व गुणवत्तेनुसार प्रगतीत असून, याची महापालिकेच्या वतीने नियमितपणे तपासणी केली जाते.

तथापि, या संदर्भात कांही नागरिकांनी व सामाजिक संस्थांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, कार्यवाही करुन, तक्रारीचे निराकरण करण्यात आलेले आहे.

-----------------

## खारघर परिसरातील मुंबईहून पनवेलकडे जाणाऱ्या महामार्गावर पडलेले खड्डे बुजविण्याबाबत

**(५) * ८६४४४ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खारघर परिसरातील हिरानंदानी ब्रिजजवळ मुंबईहून पनवेलकडे जाणाऱ्या महामार्गावर पडलेले खड्डे बुजविण्याबाबत व आजुबाजूच्या परिसराचे सुशोभिकरण तातडीने करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान मा.व्यवस्थापकीय संचालक, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बांद्रा यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्यावरील खड्डयांमुळे महामार्गावर मोठया प्रमाणात वाहतूकीची कोंडी होत असून नागरिकांना शारिरीक, मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्यावर पडलेले खड्डे बुजविण्याची तसेच रस्त्याचे सुशोभिकरण करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी वारंवार करूनसुध्दा संबंधित प्राधिकरणाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशा प्रकारचे निवेदन शासनास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(२), (३) व (४) सदर रस्त्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत खाजगीकरणांतर्गत करण्यात आले असून, सवलत कालावधीमध्ये देखभाल दुरुस्ती व सुशोभीकरण करण्याची जबाबदारी उद्योजकाची आहे. यावर्षी २०१७ च्या पावसाळया दरम्यान खारघर उड्डाणपुलाच्या “स्लिप रोड” वर खड्डे पडले असून, दुरुस्तीबाबत उद्योजकास वारंवार लेखी तसेच तोंडी सुचना देऊन काम करीत नसल्याने, उद्योजकाच्या जबाबदारी व खर्चाने (Risk & Cost) विभागामार्फत दुरुस्ती सुरु करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सायन-पनवेल महामार्गावरील एव्हराड नगर (चुनाभट्टी) येथील नाल्यावर असलेला पूल खचल्याबाबत

**(६) * ९०४२९ श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सायन-पनवेल महामार्गावरील एव्हराड नगर (चुनाभट्टी) येथील नाल्यावर असलेला पुल दिनांक १३ जुन, २०१७ रोजी वा त्या सुमारास खचला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुल खचल्याने महामार्गावरील ठाणे, पनवेलकडे जाणारी वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली असून अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून सदर पुल त्वरित दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पूर्व द्रुतगती मार्गावरील एव्हराड नगर (चुनाभट्टी) येथील नाल्यावरील पूल खचला नसुन पूलाचा नाल्याकडील दगडी भरावाचा काही भाग पावसामुळे खचला आहे.

(२), (३) व (४) सदर दगडी भराव खचलेल्या भागातील वाहतूक सुरळीत ठेवण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करून वाहतूक सुरळीत ठेवण्यात आलेली आहे. सदर दगडी भरावाच्या दुरूस्तीचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातंर्गत प्रगतीपथावर असून लवकरच काम पूर्ण करण्याचे प्रयत्न आहेत.

-----------------

## नंदुरबार (जि. धुळे) शहरातील शास्त्री मार्केट चौकात झालेल्या दंगलीत पोलीस व नागरीक जखमी होऊन मालमत्तेचे नुकसान झाल्याबाबत

**(७) * ८५९४७ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार (जि.धुळे) शहरातील शास्त्री मार्केट चौकात बिर्याणी विकणाऱ्या विक्रेत्याला केलेल्या मारहाणीनंतर त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्यामुळे दोन गटात दंगल होऊन हिंसक जमावाने केलेल्या दगडफेक व जाळपोळीत ३ पोलीस व अनेक नागरीक जखमी होऊन मालमत्तांचे हजारो रुपयांचे नुकसान झाल्याची बाब दिनांक १० जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी किती व्यक्तींविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत,

(३) असल्यास, यासंपूर्ण प्रकरणाची चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर प्रकरणी दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत व भविष्यात असे प्रकार होऊ नयेत म्हणून उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे. शास्त्री मार्केट जवळ घडलेल्या घटनेबाबत पोलीस स्टेशन नंदुरबार येथे दिनांक ५.६.२०१७ रोजी गु.र.नं.२०४/२०१७ भा. द. वि. कलम ३०२,३०७,३९४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२), (३) व (४) यासंपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी केली असून दंगल करणे, दगडफेक व जाळपोळ करुन सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केल्याप्रकरणी दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यापैकी दिनांक १०.६.२०१७ रोजी नंदुरबार शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.२३३/२०१७ भा.द.वि. कलम ३९५, ३०७, १४३, १४७, १४९, ४५२, ३३३, ३३२, ३२३, ४३५, ४३६, ४२७, १२०(ब) तसेच हिसंक कृत्य व मालमत्ता नुकसान प्रतिबंधक कायदा कलम ३ व ४ व मुंबई पोलीस अधिनियम कलम ३७(१),(३) चे उल्लंघन १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्हयांमध्ये दोन्ही धर्मीयांच्या एकूण २९ व्यक्तींना (यामध्ये ६ विधी संघर्षीत बालके आहेत) अटक करण्यात येऊन त्यांच्यासह दोन्ही धर्मीयांच्या इतर १५० ते २०० व्यक्तीं विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे दुसरा गुन्हा दिनांक १२.६.२०१७ रोजी नंदुरबार शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.२३४/२०१७ भा.द.वि.कलम ३०७, ३५३, ३३२, ३३३, ३३७, १४३, १४७, १४९, १२०(ब) तसेच मुंबई पोलीस अधिनियम कलम ३७(१),(३) चे उल्लंघन १३५ प्रमाणे १ अटक व ३ निष्पन्न आरोपींसह १५० ते २०० व्यक्तीं विरुध्द दाखल करण्यात आला आहे.वरील दोन्ही गुन्हयांचा तपास सुरु असून अटक आरोपींविरुध्द रिमांड घेण्यात आला असून २३ आरोपींवर सीआरपीसी ११० इग प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे.फरार आरोपींचा शोध घेण्यात येत आहे. भविष्यात असे प्रकार होऊ नयेत म्हणून दंगलग्रस्त व संवेदनशिल भागात पोलीस बंदोबस्त लावण्यात आला असून सदर भागातील मोहल्ला, शांतता च्या बैठका घेऊन जातीय सलोखा अबाधित राहण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विटा (जि. सांगली) शहराकरीता नवीन पाणीपुरवठा योजना सुरु करणेबाबत

**(८) * ९१५२२ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विटा नगरपरिषद (जि.सांगली) हद्दीमध्ये माहे एप्रिल, २०१७ पासून अनियमित पाणीपुरवठा होत असल्याने तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत विटा शहरास नवीन पाणीपुरवठा योजना सुरु करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ५ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केल्यानुसार नवीन पाणी पुरवठा योजनेसंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे तसेच त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) • विटा शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य पाईप लाईनमधील गळतीमुळे माहे एप्रिल, २०१७ मध्ये विटा शहराचा ८ दिवस पाणीपुरवठा अनियमीत होता.

• तथापि, सदर गळतीचे काम पुर्ण करुन पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आला असून विटा शहरात तीव्र पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण झाली नसल्याचा अहवाल विटा नगरपरिषदेने सादर केला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) (४) • महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानाच्या स्थायी आदेशानुसार नगर परिषदेने पाणीपुरवठा प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन त्यास सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता घेऊन नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत शासनास सादर करणे आवश्यक आहे.

• त्यानुसार, विटा नगरपरिषदेने सुधारित पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव तांत्रिक मान्यतेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सादर केला आहे.

-----------------

# चिपळूण शहरातील (जि. रत्नागिरी) विरेश्वर तलाव परिसरात केटामाईन या अंमली पदार्थ पावडराची विक्री होत असल्याबाबत

**(९) * ८५२३० श्री.विजय औटी (पारनेर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोटे (ता.खेड, जि.रत्नागिरी) औद्योगिक वसाहतीतील सुप्रिया लाईफ सायन्स या रासायनिक कंपनीतील कर्मचाऱ्यांकडून सुमारे १० कोटी रुपयांपेक्षा अधिक किंमतीची केटामाईन हा अंमली पदार्थ जप्त करण्याची घटना दिनांक १२ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास चिपळूण शहरातील (जि.रत्नागिरी) विरेश्वर तलाव परिसरात घडली असून याप्रकरणी ३ कर्मचाऱ्यांना पोलिसांनी अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुमारे २ वर्षांपूर्वी याच कंपनीतील केटामाईन या अंमली पदार्थ पावडरच्या परस्पर विक्रीचा प्रकार निदर्शनास आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामध्ये सदर कंपनी मालक व व्यवस्थापनाचाही सहभाग असूनही तपास यंत्रणा याकडे दुर्लक्ष करुन कंपनी मालक व व्यवस्थापनाला वाचविण्याचा प्रयत्न करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी सखोल चौकशीची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १७ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये शासनाच्या संबंधित विभागांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने उक्त प्रकरणाची चौकशी करून चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक १२.०६.२०१७ रोजी श्री. संतोष हरी कदम यांना ५ किलो ०८५ ग्रॅ. केटामाईन पावडर सह चिपळूण येथे अटक करण्यात आली असून सदर व्यक्तीस श्री. स्वप्नील खचरे व दिपक कदम यांनी सदर पावडर पुरविल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना देखील अटक करण्यात आली.

या पैकी श्री. मंगेश कदम हे सुप्रिया लाईफ सायन्सचे लि. कंपनी येथे सप्टेंबर २०१६ ते मार्च २०१७ पर्यंत कार्यरत होते व इतर दोघे कंपनीचे कामगार नसल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

(२) होय, हे खरे आहे. सन २०१४ मध्ये चिपळूण पोलीस स्टेशन भाग - ६ गुन्हा रजि. नं. १२/२०१४ एन.डी.पी.एस ॲक्ट ८ (क), २१(सी), २२(सी), २९ अन्वये दाखल आहे.

(३) हे खरे नाही. सह आयुक्त, अन्न व औषध प्रशासन कोकण विभाग, ठाणे यांना चिपळूण पोलीस ठाणे यांचेकडून अहवाल देण्यात आला व त्या अहवालाच्या अनुषंगाने त्यांनी त्यांच्याकडील दि. २०.०६.२०१७ च्या आदेशान्वये कंपनीतील केटामाईन या पदार्थाचे उत्पादन पुढील आदेश येईपर्यंत तात्काळ बंद करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच अन्न व औषधी प्रशासन विभागाच्या अधिका-यांकडून कंपनी तपासणी करण्यात आली असूण त्याबाबतचा अहवाल प्राप्त झाला असून कंपनीचे मालक व व्यवस्थापन यांचा सहभाग तसेच परवाण्यातील अटी व शर्तींचा भंग होऊन सदर कायद्यान्वये तसेच इतर कायद्यान्वये तपास सुरू आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) सदर गुन्ह्याचा तपास सुरू असून ३ आरोपीना अटक करण्यात आली असूण सदर आरोपी सद्या न्यायालयीन कोठडीत आहे.

-----------------

## नांदेड जिल्हयात सितार गुटख्याच्या पाऊचवर राज्य पोलीस जाहिरात करीत असल्याचे छायाचित्र छापले असल्याबाबत

**(१०) * ८७२२८ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गुटखा बंदी असताना नांदेड जिल्हा व शहरात मोठया प्रमाणात गुटखा विक्री होत असून येथे सितार गुटख्याच्या पाऊचवर महाराष्ट्र राज्य पोलीस जाहिरात करीत असल्याचे छायाचित्र छापले असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन पोलीस प्रशासनाची प्रतिमा मलिन करणा-या सदर सितार गुटखा उत्पादकावर कारवाई करण्याबाबत व संपूर्ण जिल्हयातील गुटखा विक्रीला प्रतिबंध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दि. २९/०६/२०१७ रोजी गुप्त बातमी मिळाल्याने अन्न भेसळ अधिकारी व विशेष पथक अधिकारी यांनी देगलूर नाका नांदेड भागात विविध ठिकाणी छापे मारुन सितार, गोवा, सुगंधी तंबाकु व इतर तत्सम पदार्थ असा एकुण १२,९३,५७०/- रुपयांचा गुटखा जप्त केला आहे.

सदर जप्त गुटख्यापैकी सितार गुटख्याच्या पाऊचवर पोलीस अधिकाऱ्याच्या गणवेशातील एका व्यक्तीचे चित्र व इतर दोन व्यक्तीचे चित्र आढळून आले आहे. सदर चित्र हे स्पष्ट नसल्याने ते महाराष्ट्र राज्यातील पोलीस अधिकाऱ्याचे आहे किंवा इतर राज्यातील पोलीस अधिकाऱ्याचे आहे हे निष्पन्न झाले नाही.

(२) अन्न व औषध प्रशासनाद्वारे नांदेड जिल्हयामध्ये चोरट्या व छुप्या मार्गाने बाहेरील राज्यातून येणारा तसेच, अवैधरित्या विक्री होणाऱ्या गुटखा व तत्सम प्रतिबंधित अन्न पदार्थ प्रकरणी सन २०१६ -२०१७ या कालावधीत व अद्यापपर्यंत एकुण ४२ ठिकाणी कारवाया करण्यात आल्या असून त्यामध्ये रुपये २,०४,६२,१४८/- इतक्या किंमतीचा साठा जप्त करण्यात आलेला आहे.

दि. २९/०६/२०१७ रोजीच्या प्रकरणातील गुटख्याचे नमुने अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन विभाग, नांदेड यांचेकडून रासायनिक परिक्षणासाठी पाठविण्यात आले आहेत. सदरचा अहवाल प्राप्त होताच व तपास पूर्ण झाल्यावर संबंधित दोषी व्यक्ती विरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) विलंब झाला नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) परिसरासाठी अग्निशमन दलाची स्थापना करणेबाबत

**(११) * ८६९५५ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.चरण वाघमारे (तुमसर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणंधे (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील औद्योगिक वसाहतीमध्ये दिनांक ०१ जून,२०१७ रोजी वा त्या सुमारास पी.बी.पॅकेजिंग कंपनीला भीषण आग लागून संपूर्ण कंपनी जळून खाक झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिसरामध्ये आसनगाव, आटगाव, वासिंद, पुंणधे, खर्डी परिसरातील औद्योगिक वसाहतीमध्ये शेकडो उद्योग असतानाही या ठिकाणी अग्निशमन दल कार्यरत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथे एखाद्या कारखान्याला आग लागल्यास भिवंडी-कल्याण पालिकेच्या अग्निशमन दलांच्या जवानांना पाचारण करावे लागते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शहापूर परिसरासाठी अग्निशमन दलाची स्थापना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय.

(४) शहापूर नगरपंचायत दिनांक १३.०६.२०१५ रोजी स्थापन करण्यात आली आहे. राज्यातील महानगरपालिका / नगरपरिषदांमध्ये अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करण्यासाठी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान दिनांक ३१.०८.२००९ पासून राबविण्यात येत आहे. सदर अभियान नव्याने निर्माण झालेल्या / होणाऱ्या “ड” वर्ग महानगरपालिका, नगरपरिषदा तसेच नगरपंचायतीमध्ये

राबविण्याचा निर्णय शासनाने दिनांक १२.०८.२०१६ रोजी घेतला आहे. सदर अभियानातंर्गत निधी वितरीत करताना त्यांच्या कार्यक्षेत्राबाहेर सुमारे २० चौ. कि. मी. परिसरात अग्निशमन सेवा देणे बंधनकारक आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माणगाव (जि.रायगड) शहरातील अंतर्गत रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाली असल्याबाबत

**(१२) * ९३२४३ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माणगाव (जि.रायगड) शहरातील अंतर्गत रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झालेली असून शहरातील मुख्य रस्ता कचेरी रोड मार्ग, जुना माणगाव, निजामपूर रोड मार्ग, बामणोली रोड मार्ग, भादाव मोर्बा रोड, सिध्दी नगर आदि सर्वच ठिकाणच्या रस्त्यांची दुरवस्था झाल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रस्त्यांवर जागोजागी खडडे पडल्याने वाहन चालक, नागरिक, विद्यार्थी यांना अत्यंत गैरसोयीचे होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त रस्त्याच्या दुरवस्थेबाबत नगरपंचायतीचे लक्ष वेधूनही अदयापी कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदुनसार यास जबाबदार असणा-या व्यक्तींविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) माणगांव नगरपंचायत जून, २०१५ मध्ये अस्तित्वात आली आहे.

माणगाव शहरातील राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ ते कचेरी रोड व राज्य महामार्ग क्र. ९८ ते दत्तनगर आश्रमशाळा या रस्त्यांच्या कामांना कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड यांचेकडून तांत्रिक मान्यता

मिळाली आहे. जिल्हाधिकारी यांचेकडून प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावावर कार्यवाही करण्यात येत आहे.

माणगांव नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याचे काम सूरु असून जूना माणगांव, बामणोली रोड मार्ग, भादाव, सिध्दी नगर तसेच उर्वरीत रस्त्यांची दुरुस्ती / डागडूजी सबंधी लवकरच कार्यवाही करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील भायखळा (प.) येथील बापुराव जगताप मार्गावरील शिवनेरी इमारतीच्या दुरुस्तीबाबत

**(१३) * ९००३२ श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भायखळा (प.) येथील बापुराव जगताप मार्गावरील ८४५ शिवनेरी इमारतीचे प्लास्टर बाहेरुन व आतील बाजूने खराब झाल्यामुळे खोल्यांमध्ये पावसाचे पाणी झिरपत असल्याने तेथील रहिवाशांना मागील दोन वर्षापासून प्रचंड त्रास होत असून इमारतीस धोका निर्माण झाला आहे, हे खरे हे काय,

(२) असल्यास, सदरहू इमारतीची म्हाडाकडून दुरुस्ती सुरु असून कंत्राटदाराने इमारतीचे प्रवेशद्वार व तळमजला ते पाचव्या मजल्यापर्यंतचे बाहेरील भिंतीचे प्लास्टर माहे एप्रिल, २०१७ मध्ये तोडल्यानंतर त्यावर पुन्हा नवीन प्लास्टर न केल्याने सध्याच्या पावसाळयात इमारतीला अधिक धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शिवनेरी रहिवाशी संघाने मुंबई इमारत दुरुस्ती मंडळाकडे समक्ष लेखी तक्रार अर्ज देवूनही मंडळाकडून अद्याप कोणतीही दखल घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करुन म्हाडाने संबंधित दोषी अधिका-यांविरुध्द व ठेकेदाराविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय हे खरे आहे.
(२) व (३) होय, तथापि सदर इमारतीचे दुरूस्ती काम सुरू करण्यात आले आहे.
(४) सदर इमारत दुरूस्तीचे काम सुरू करण्यात आले असल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) पावसाची संततधार सुरू असल्याने दुरूस्तीच्या कामामध्ये अडचण निर्माण होत असल्याने विलंब होत आहे.

-----------------

## मे. टेक्नोट्रेड इंपेक्स प्रा. लि. मुंबई या कंपनीने बॉम्बशोधक व नाशक पथकासाठी निकृष्ट दर्जाचे बॉम्ब सुट्स खरेदी केल्याबाबत

**(१४) * ८५०२८ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईमध्ये दिनांक २६ नोव्हेंबर, २००८ रोजी झालेल्या अतिरेकी हल्ल्यानंतर शासनाने दिनांक २६ डिसेंबर, २००८ रोजी प्रत्येक बॉम्बशोधक व नाशक पथकासाठी ४ नग बॉम्ब डिस्पोजल सुट्स याप्रमाणे ८० नग बॉम्ब सुट्सची खरेदी करण्यास मान्यता दिली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचे बॉम्ब सूट खरेदी करण्याचे काम निविदा प्रक्रियेतून मे. टेक्नोट्रेड इंपेक्स प्रा. लि. मुंबई या कंपनीला देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निविदेमध्ये उत्तम व उच्च प्रतीचे बॉम्ब सुट्स अमेरिकेतून खरेदी करण्याची अट असताना देखील सदर कंपनीने साऊथ आफ्रिका व चीन येथून निकृष्ट दर्जाचे बॉम्ब सुट्स खरेदी केल्याचे निदर्शनास आल्याने कंपनीवर शासनाची फसवणूक करून शासकीय रकमेचा अपहार केल्यामुळे कुलाबा पोलीस ठाण्यामध्ये दिनांक १३ मार्च,२०१२ रोजी एफ.आय.आर. दाखल झाला आहे व याबाबतची सखोल चौकशी करण्यासाठी आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांच्याकडे वर्ग करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मे. टेक्नोट्रेड इंपेक्स प्रा.लि. मुंबई या कंपनीवर शासनाच्या विविध विभागांना फसविल्याचे गुन्हे दाखल असून कंपनी व संचालकावर

गुन्हे दाखल होऊनही अद्यापपर्यंत त्याचा तपास पूर्ण झालेला नसल्याचे निदर्शनास आले आहे तसेच बॉम्ब सुट्स चीन व साऊथ आफ्रिका येथून खरेदी केल्याने त्यांचाही लिखित खुलासा (LR) चौकशीमध्ये मागविला असताना अद्यापपर्यंत सदर खुलासा मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या गंभीर प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार या प्रकरणातील दोषींवर व सदर कंपनीवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे. तथापि, या प्रक्रियेमध्ये एकूण ८२ नग बॉम्बसूटस् खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली होती.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) सदर प्रकरणी तक्रारीवरून दि. १३.०३.२०१२ रोजी मे. टेक्नोट्रेड इंपेक्स इंडिया प्रा.लि. चे संचालकांविरूद्ध कुलाबा पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र २१/२०१२ भा.दं.वि. संहिता कलम ४२०, ४०६, ४६९, ४११, ४१८, १२० (ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्याचा पुढील तपास आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई करीत आहे. सदर गुन्ह्याच्या तपासात कंपनीने एकूण ८२ बॉम्ब सूट पैकी ४६ बॉम्ब सूट चीन मधील मे. बीजींग ॲनलाग टेक अँड ट्रेड कंपनी तसेच उर्वरित ३६ बॉम्ब सूट साऊथ आफ्रिका येथील मे. सेविअर डायग्नोस्टिक्स एसए कंपनी यांच्याकडून आयात करण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर गुन्ह्याचा तपास अमेरिका, चीन व दक्षिण आफ्रिका या देशातही होणे आवश्यक असल्याने त्याकरिता लेटर रोगॅटरी (LR) पाठविण्याची कार्यवाही सुरू असून सदर प्रक्रिया क्लिष्ट असल्याने तपास पूर्ण करण्यास विलंब होत आहे. तसेच सदर कंपनीस बॉम्ब सूटच्या बीलापोटी अदा करण्यात आलेली रक्कम रू.६,२१,६९,१२०/- व्याजासह (१८%) परत मिळणेबाबत मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, मुंबई येथे कंपनी विरूद्ध दि.१३/०२/२०१६ रोजी सिव्हील सूट क्र.६२/२०१७ दाखल करण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे सदर प्रकरणाची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या उघड चौकशी अहवालाच्या आधारे गृह विभागातील ३ अधिकारी/कर्मचारी यांची विभागीय चौकशी पूर्ण करण्यात आली असून एका कर्मचा-यास शिक्षा बजावण्यात आली आहे व दोन अधिकारी यांचेवरील शिक्षेबाबतची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. पोलीस महासंचालक कार्यालयातील ९ अधिकारी/कर्मचा-यांपैकी ३ अधिकारी/ कर्मचा-यांना शिक्षा देण्यात आली असून ४ अधिकारी/कर्मचारी यांना चौकशी अंती दोषमुक्त करण्यात आले आहे व २ अधिका-यांची चौकशी चालू आहे.

-----------------

## महागांव नगरपंचायतीच्या (जि. यवतमाळ) रस्ते विकास निधीमधून शहरातील डांबरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(१५) * ९३८२१ श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागांव नगरपंचायतीच्या (जि.यवतमाळ) रस्ते विकास निधीमधून शहरात २२ लाखांच्या डांबरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याप्रकरणी मुख्याधिकारी यांनी माहे मे, २०१७ च्या सुमारास चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व चौकशीनुसार संबधित ठेकेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) स्थानिक लोकप्रतिनिधींनी, रस्त्यांच्या डांबरीकरणासाठी वापरण्यात आलेल्या सामुग्रीबाबत व गुणवत्तेबाबत केलेल्या मौखिक तक्रारीच्या अनुषंगाने मुख्याधिकारी यांनी मे, २०१७ मध्ये शासकीय तंत्रनिकेतन, यवतमाळ यांचेकडे सामुग्री तपासणीसाठी पाठविली आहे.

(२) याबाबतचा तपासणी अहवाल दि.२६.०७.२०१७ रोजी प्राप्त झाला आहे. सदर तपासणी अहवालानुसार सामुग्री समाधानकारक आहे. सदरचे काम पूर्ण झाल्यानंतर धनादेश देण्यापूर्वी सदर कामाचे नियमानुसार ऑडीट करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र ओनरशिप फ्लॅट कायद्यानुसार करारनामा करताना विकासकाला ३० टक्के रक्कम स्वीकारण्याची तरतूद रिअल इस्टेट नियमात करण्यात आल्याबाबत

**(१६) * ८५३२३ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र ओनरशिप फ्लॅट कायदा म्हणजे मोफानुसार करारनामा करताना विकासक २० टक्के रक्कम सदनिका आरक्षित करताना घेऊ शकतो अशी तरतूद आहे त्याऐवजी केंद्रीय कायद्यात सुरुवातीला १० टक्के रक्कम आकारुन विकासक सदनिका आरक्षित करु शकतो असे असतानाही शासनाने रिअल इस्टेट नियमात सदनिका आरक्षित करताना १० टक्के ऐवजी ३० टक्के रक्कम कोणतेही बांधकाम होण्यापूर्वी स्वीकारण्याची अनुमती देण्याची नियमात तरतूद केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नियमाच्या दुरुस्तीमुळे विकासक कोणतेही बांधकाम सुरु न करता ३० टक्के रक्कम स्वीकारुन ग्राहकांना वर्षानुवर्षे वाट पाहवयास लावण्याची भिती निर्माण झाल्याने मुंबई ग्राहक पंचायतीने हरकत घेऊनही दिनांक २२ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास जारी केलेल्या नियमात सदरची तरतूद कायम ठेवण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्रीय कयद्याच्या मूळ उद्देशाकडे महाराष्ट्र शासनाकडून दुर्लक्षित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार सदरची तरतूद काढून टाकण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :**(१) व (२) हे खरे नाही.

स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ मधील कलम १३ नुसार विकासक एखादी सदनिका/खुली जागा/ इमारतीच्या बुकींगसाठी खर्चाच्या जास्तीतजास्त १० टक्के पर्यंतची रक्कम बुकींगसाठी स्विकारु शकतो.

मात्र, तदनंतरची रक्कम स्विकारताना संबधित सदनिका/खुली जागा/ इमारतीच्या विक्री कराराची नोंदणी करणे विकासकास बंधनकारक आहे. राज्य शासनाने तयार केलेल्या महाराष्ट्र स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१७ मधील नियम १० च्या अनुषंगाने नियमासोबत दिलेल्या नमुना विक्री करारातील परिच्छेद १ (क) मधील तरतुदीनुसार विकासक ३० टक्के रक्कम ही कराराची नोंदणी केल्यानंतरच स्विकारु शकतो. सदर तरतूद केंद्र शासनाच्या नियमाशी विसंगत नाही.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) चौकशीचा/विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई येथे आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१७) * ८४९४१ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई येथे उभारावयाच्या आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम करण्याच्या संदर्भातील निविदेला शासनाची मंजुरी न मिळाल्याने काम प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर विमानतळाचे काम तातडीने व्हावे म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून (PPP) विकास करण्यात येत असून जागतिक बोली प्रक्रियेद्वारे योग्य भागीदाराची निवड करण्याच्या अनुषंगाने विमानतळ विकासाशी संबंधित प्रारुप निविदा टप्प्यातील दस्तऐवजांना व करारनाम्यांना शासन निर्णय दि.२७ एप्रिल, २०१६ नुसार मान्यता देण्यात आली आहे.

याकरिता सुरु करण्यात आलेल्या बोली प्रक्रियेमध्ये दि.१३.२.२०१७ रोजी दोन बोली प्राप्त झालेल्या असून त्यास प्रकल्प व्यवस्थापन आणि अंमलबजावणी समितीची (PMIC) मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिह्यातील गडचांदूर व कोरपना येथील कंपन्यांमध्ये प्रकल्पग्रस्त व स्थानिकांना रोजगार उपलब्ध करुन देणेबाबत

**(१८) * ९३१२२ ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचांदूर व कोरपना (जि.चंद्रपूर) येथील माणिकगड सिमेंट, अल्ट्राटेक सिमेंट, अंबुजा सिमेंट, मुरली ॲग्रो सिमेंट कंपनी इ. मोठे उद्योग असतांना सदर कंपन्या कंपनीमध्ये प्रकल्पग्रस्तांना नोकरी न देता परप्रांतीयांना

रोजगार देत असल्यामुळे स्थानिकांवर अनेक वर्षापासून अन्याय होत असल्याचे माहे जून, २०१७ च्या पहिल्या आठवडयात आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माणिकगड सिमेंट कंपनीने स्थानिकांच्या शेतजमिनी अधिग्रहीत करतांना अत्यल्प मोबदला दिला होता, हे ही खेरे आहे काय,

(३) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळुन आले व त्यानुषंगाने सदरहू कंपन्यांमध्ये स्थानिकांना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

शासनाच्या स्थानिक लोकांना रोजगार धोरणानुसार उदयोग घटकाने एकूण रोजगारापैकी पर्यवेक्षकीय श्रेणीत किमान ५० टक्के व पर्यवेक्षकीयसहीत इतर श्रेणीत किमान ८० टक्के स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे. माणिकगड सिमेंट, अल्ट्राटेक सिमेंट, अंबुजा सिमेंट व मुरली अॅग्रो सिमेंट हे मोठे उद्योग गडचांदूर व कोरपना, जिल्हा चंद्रपूर येथे स्थापित असून, घटकांकडून विहित प्रपत्र स्थालोरे-१ माहे मार्च,२०१७ अखेर प्राप्त करण्यात आलेले आहे. त्यानुसार स्थानिक लोकांना ८० टक्केपेक्षा जास्त रोजगार उपलब्ध झालेला आहे. मुरली अॅग्रो सिमेंट कंपनी सन २०१६ पासून बंद आहे.

(२) मे.माणिकगड सिमेंट या उद्योग घटकाने जमीन खरेदीबाबत वैयक्तिक पातळीवर स्थानिकांशी व्यवहार केल्याचे दिसून येते. यामध्ये शासनाचा सहभाग नसल्याने याबाबत चौकशी करण्याचा प्रश्न उद्धभवत नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिळ डायघर येथील एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याप्रकरणी गुन्हा नोंदविण्यास पोलीसांनी नकार दिल्याबाबत

**(१९) * ८५१२८ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिळ डायघर पोलीस ठाणे हद्दीत राहणा-या एका अल्पवयीन मुलीचे कुर्ला येथील व्यक्तींने माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान अपहरण करून तिच्यावर केलेल्या लैंगिक अत्याचाराची तक्रार पोलीस ठाणे शिळ डायघर येथे तिच्या पालकांनी देऊनही पोलीसांनी गुन्हा नोंदविण्यास नकार दिल्याची माहिती दिनांक १५ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकीय अहवालात सदर अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाले आहे असे तपासणीमध्ये आढळून आले असल्यामुळे व वारंवार तक्रार देण्याचा प्रयत्न केला असता पोलीस गुन्हा नोदविण्यास नकार देत असल्यामुळे तिच्या पालकांनी मा.मुख्यमंत्री, महिला व बालकल्याण मंत्री, पोलीस आयुक्त ठाणे यांना लेखी निवेदनही दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळुन आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

फिर्यादीने दिनांक २४/३/२०१७ रोजी दिलेल्या तक्रारीवरून शिळ डायघर पोलीस ठाणे येथे झालेल्या गुन्हयाची नोंद झालेली आहे.

(२) गुन्हा दाखल झाल्यानंतर पिडीत मुलीच्या पालकांनी वरिष्ठांकडे लेखी निवेदने दिलेली आहेत परंतु पोलीस ठाण्यात तक्रार प्राप्त झाल्यानंतर लागलीच गुन्हा दाखल केलेला आहे.

(३) फिर्यादीने तक्रार केल्यानुसार ठाणे पोलीस आयुक्त परिसरातील परिमंडळ-५ मधील शिळ डायघर पोलीस ठाणे येथे दिनांक २४.०३.२०१७ रोजी गु.र.नं. ५७/२०१७ कलम ३६३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला तसेच पिडीत मुलीची वैद्यकीय तपासणी केल्यानंतर गुन्हयास वाढीव कलम ३७६ भा.द.वि.सह लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम सन २०१२ चे कलम ४,८,१२ लावण्यात आले आहे.

(४) पोलीसांनी आरोपीच्या पत्त्यावर व पूर्वी रहात असलेल्या मुंबई ठिकाणी तपास करण्यात आला असता आरोपी मिळून आला नाही. तथापि आरोपीचा शोध घेवून लवकरात लवकर अटक करण्याची तजवीज ठेवण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर मिहान सेझ प्रकल्पात कंपन्यांना जागा उपलब्ध करून दिल्यानंतरही काही कंपन्यांनी कामे सुरु केली नसल्याबाबत

**(२०) * ८९९०१ श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर मिहान सेझ प्रकल्पात ६६ कंपन्यांना जागा उपलब्ध करून देण्यात येवून त्यापैकी १५ टक्के कंपन्यांनी काम सुरू केले असून अद्याप ५४ टक्के कंपन्याची कामे सुरू झाले नसल्याचे दिनांक २० एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपन्यांना जागा उपलब्ध करून देण्यात येवूनही अद्याप कामे सुरू न करणाऱ्या कंपन्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) मिहान सेझ प्रकल्पात ७१ कंपन्यांना जागा देण्यात आली असून त्यापैकी २१ म्हणजेच साधारणत: ३०% कंपन्या कार्यरत आहेत. तर, ५ कंपन्यांमध्ये बांधकाम सुरु आहे. उरलेल्या ४५ कंपन्यांमध्ये काम सुरु करण्यासाठी पाठपुरावा सुरु आहे.

जानेवारी २०१६ मध्ये ज्या उद्योगांनी काम सुरु केले नव्हते, अशा सर्व उद्योगांना नोटीस पाठविण्यात आली होती. त्यांतील काही कंपन्यांनी काम सुरु करण्याची तयारी दर्शविली व ते करण्यासाठी मुदतवाढ मागितली. त्याप्रमाणे, सदर भूखंडधारकांना ठराविक बांधकाम विहीत मुदतीत पूर्ण करण्याच्या अटीवर एप्रिल २०१६ पासून पुढे ४ वर्षांची मुदतवाढ देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई व उपनगरातील रेल्वे परिसरातील झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करणेबाबत

**(२१) * ८५०३९ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व उपनगरातील विमानतळ परिसरातील झोपडपट्टी पुनर्विकासाच्या धर्तीवर रेल्वेच्या हद्दीतील ८० हेक्टर इतक्या जागेवरील १२ लाख झोपडपट्टीवासीयांसाठी रेल्वे आणि एसआरए प्राधिकरण यांच्या संयुक्त उपक्रमातून पुनर्विकासाच्या योजनेस मा. मुख्यमंत्री महोदयांनी तत्वतः मान्यता देऊन तसा लेखी प्रस्ताव तत्काळ रेल्वे मंत्रालयास पाठविण्याचे निदेश दिनांक १८ एप्रिल, २०१७ रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रेल्वे हद्दीतील झोपडीधारकांच्या पुनर्वसनासाठी केंद्रीय रेल्वे मंत्रालयाकडे शासनातर्फे पुनर्विकासाच्या योजनेचा प्रस्ताव कोणत्या दिनांकास पाठविण्यात आला आहे व याबाबत केंद्र शासनाकडून मान्यता मिळणेबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, सदरहू पुनर्विकास प्रकल्पाबाबत शासनातर्फे करण्यात आलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) व (२) मा. मुख्यमंत्री व मा. केंद्रिय रेल्वे मंत्री यांच्या दरम्यान दि.१८.०४.२०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये रेल्वेच्या मालकीच्या जमिनीवरील झोपडीधारकांच्या पुनर्वसनाच्या धोरणाबाबत मुद्दा चर्चेस होता. सदर बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना सरव्यवस्थापक, मध्य रेल्वे यांच्याशी संपर्क साधून रेल्वेच्या मालकीच्या जमिनीवरील झोपडीधारकांचे पुनर्वसन संयुक्तपणे करण्यासाठी रेल्वे मंत्रालय व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्यामध्ये संयुक्त उपक्रम (J.V.) स्थापण्याबाबत व्यवहार्यता तपासण्याचे व त्यासाठी सरव्यवस्थापक, मध्य रेल्वे यांचेशी संपर्क साधून पुढील कार्यवाही करण्याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांना कळविण्यात आले आहे.
(३) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाद्वारे पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेतील सुरक्षा विभागात गैरव्यवहार सुरु असल्याबाबत

**(२२) * ८६३०९ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेत सुरक्षा विभागात वरिष्ठ अधिकारी, पर्यवेक्षक व संबंधितांच्या संगनमताने गैरकारभार सुरु असल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्य सुरक्षा अधिकारी यांना कंत्राटदारास मुदतवाढ मिळवून देण्यासाठी दिनांक ३ जून, २०१७ रोजी ४ लक्ष रु. ची लाच स्वीकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी पकडले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बनावट हजेरी लावून पगार वाटपासह, अनियमितपणे कंत्राटदारास मुदतवाढ अशाप्रकारे सुरक्षा विभागाच्या अनागोंदी कारभाराने महापालिकेचे आर्थिक नुकसानीसह शासनाची फसवणूक होत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) तत्कालीन मुख्य सुरक्षा अधिकारी, पुणे महानगरपालिका यांना दि.३.६.२०१७ रोजी सुरक्षा रक्षक पुरविण्याच्या कंत्राटाला मुदतवाढ देण्यासाठी त्रयस्थ व्यक्तीमार्फत रूपये ४ लाख स्विकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडले ही वस्तुस्थिती आहे. याबाबतची बातमी दि.३.६.२०१७ रोजी वृत्तपत्रात आली होती.
(३) व (४) • पुणे महानगरपालिकेच्या संबंधीत विभाग प्रमुखाने सुरक्षा रक्षकांच्या मासिक हजेरी पत्रकावर स्वाक्षरी केल्यानंतर तसेच सदर देयकाचे सुरक्षा विभाग व लेखा विभागामार्फत छाननी केल्यानंतर देयक अदा करण्यात येते.
• कंत्राट देण्यासाठी विहित प्रक्रिया यथाशिघ्र करण्याबाबत तसेच पुणे महानगरपालिकेतील कंत्राटी सुरक्षा रक्षकांच्या निविदांच्या कामामध्ये अनियमितता होऊ नये याकरिता दक्षता घेण्याच्या सूचना आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना दिलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## घुग्घुस (जि.चंद्रपूर) येथील अल्पवयीन मुलीवर झालेला लैंगिक अत्याचार

**(२३) * ९३३४७ श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घुग्घुस (जि.चंद्रपूर) येथील कॉलनी क्र. १ बंगाली कॅम्पमधील एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी पोलिसांनी बंगाली कॅम्पातील चंद्रकांत लोकनाथ भारती यांना माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषीविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) फिर्यादी यांनी तक्रार दिल्यावरून आरोपीविरूध्द घुग्घुस पो.स्टे.येथे अप.क्र. ३६०/२०१७ कलम ३५४,३५४(अ) भा.द.वि.सह कलम ८ बा.लै.अ.सं. अधिनियम, २०१२ अन्वये गुन्हा नोंदविण्यात येऊन पिडीत मुलीचे १६४ दंप्रसं अन्वये जबाब घेतला आहे. सदर घटनेच्या अनुषंगाने आरोपीस दिनांक १९/६/२०१७ रोजी अटक करण्यात आली.

सदर घटनेत मा. न्यायालयाने दिनांक ६/७/२०१७ रोजी आरोपीस जामिन केल्याने घुग्घुस पो. स्टे. यांनी आरोपी विरूद्ध इस्तेगाशा क्र ८०/२०१७ कलम १०७,११६(३) जाफौ प्रमाणे प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे आरोपी विरोधात अधिक पुरावे गोळा करून मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती येथील श्री सूर्या इन्व्हेस्टमेंट या कंपनीने गुंतवणूकदारांची फसवणुक केल्याबाबत

**(२४) * ९३३३४ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील श्री सूर्या इन्व्हेस्टमेंट या कंपनीने मोठ्या प्रमाणावर गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याचे निदर्शनास येवून २ वर्ष होऊनही अद्यापपर्यंत फसवणूक करणाऱ्यांविरुद्ध कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सूर्या इन्व्हेस्टमेंट कंपनीच्या मालमत्तेची विक्री करून फसवणूक झालेल्या गुंतवणूकदारांचे पैसे परत देणे शक्य असतानाही अद्यापही कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सूर्या इन्व्हेस्टमेंट कंपनीच्या संचालकांवर व सदर कारवाई करण्यास विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) श्रीसूर्या इन्व्हेस्टमेंट या कंपनीने गुंतवणुकदारांची फसवणुक केल्याबाबत पो.स्टे. राजापेठ, अमरावती शहर येथे अप.क्र.३०५/१३ कलम ४२०, ४०६, ४०९, ४६५, ४६७, ४६८, ४७१, २०१, १२० (ब), ३४ भा.दं.वि. सह कलम ३ व ४ एम.पी.आय.डी., आर.बी.आय. ॲक्ट, १९३४ कलम ५८ बी (५-ए), ५८ ई, आय.टी. ॲक्ट कलम ७१ प्रमाणे दिनांक ३०.१०.२०१३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच या गुन्ह्याव्यतिरिक्त राणा प्रतापनगर पोलीस स्टेशन, नागपूर येथे अपराध क्र.३४८/१३ कलम ४०६, ४०९, ४२०, २०१, १२० (ब), ३४ भा.दं.वि. सह कलम ३ एम.पी.आय.डी., आर.बी.आय.ॲक्ट, १९३४ कलम ४५ (एस), ५८ (बी) (५ ए) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हा क्र.३०५/१३ शी संबंधित १६ आरोपींपैकी श्रीसूर्या इन्व्हेस्टमेंट या कंपनीचे दोन संचालक तसेच इतर ७ आरोपींना या गुन्ह्यासंदर्भात

वेगवेगळ्या तारखेस अटक करण्यात आली आहे. उर्वरीत सहा आरोपींनी अटकपूर्व जामीन घेतला असून एक आरोपी फरार आहे. त्यांचेविरुद्ध मा.न्यायालयात दिनांक ०७.०२.२०१४ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

एम.पी.आय.डी. कायद्यानुसार मालमत्तेची विल्हेवाट लावण्याकरिता सक्षम प्राधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच संरक्षित मालमत्ता शासन अधिसूचना दिनांक ०९.१०.२०१४ अन्वये कलम ४ प्रमाणे अधिसूचित केली आहे. याव्यतिरिक्त नव्याने संरक्षित केलेली मालमत्ता अधिसूचित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पातुर (जि.अकोला) येथे बांधण्यात आलेल्या आग्निशमन दलाच्या इमारतीबाबत

**(२५) * ९०४१२ श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पातुर (जि.अकोला) येथे ३५ लक्ष रुपये खर्च करुन बांधण्यात आलेल्या अग्निशमन दलाच्या इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले असून ही इमारत सद्य:स्थितीत विनावापर पडून असल्याची बाब माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारत अवैध उदयोगांचे केंद्र बनली असून शासनाने आग नियंत्रणासाठी खर्च केलेल्या लाखो रुपयांचा निधी वाया गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे काय कार्यवाही केली आहे तसेच सदर इमारतीच्या कामाची क्वालीटी कंट्रोलदवारा तपासणी करुन यामध्ये आढळून येणाऱ्या दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) अग्निशमन इमारतीचे काम ऑक्टोबर, २०१३ मध्ये पूर्ण झाले आहे. यात एक अग्निशमन वाहन ठेवण्याकरीता व वरचा मजला अग्निशमन अधिकारी/कर्मचारी याच्या निवासस्थानासाठी आहे.

- नगरपरिषद पातुर यांच्या आस्थापनेवरील अग्निशमन विभागातील पदे रिक्त असल्याने सदर इमारतीचा वापर सुरू नाही.
- राज्यातील अग्निशमन सेवेतील पदांचे सेवा प्रवेश नियम सुधारीत करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. त्यानुसार नगरपरिषद पातुर यांच्या आस्थापनेवरील अग्निशमन विभागातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.
- अग्निशमन इमारतीच्या कामाची तपासणी करुन अहवाल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, अकोला यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सामाजिक व व्यावसायीक पायाभुत सुविधांचा झोपडपट्टी पुनर्विकासात समावेश करण्याबाबत

**(२६) * *८४९१५* श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शहरांमधील झोपडपट्ट्यांच्या पुनर्विकासाला चालना मिळावी यासाठी सामाजिक व व्यावसायीक पायाभुत सुविधांचा झोपडपट्टी पुनर्विकासात समावेश करावा अशी विनंती करणारे पत्र राज्याच्या मा.मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय नगरविकास मंत्री यांना पाठविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील झोपडपट्टी पुनर्विकासात वाहतूक, विद्युत निर्मिती, पाणी, स्वच्छता, सामाजिक व व्यायासायीक पायाभुत सुविधांचा समावेश करण्याची केंद्रीय अर्थ मंत्रालयाने दिनांक १३ ऑक्टोबर, २०१४ रोजी सुचना काढून देशांतर्गत राज्यातील शहरांमध्ये झोपडपट्टी पुनर्विकासासाठी समावेश करण्याबाबत अधिसूचना काढल्यानंतर त्यानुषंगाने मा. मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय नगरविकास मंत्री यांना पत्र पाठवून विनंती केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईसह अन्य आरक्षित असलेल्या शासकिय किंवा खासगी जमिनीवर अतिक्रमण करुन वसलेल्या झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास सदर सुविधांच्या अनुषंगाने करण्यात येणार आहे काय,
(४) असल्यास, या अनुषंगाने निर्णयात्मक कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. प्रकाश महेता :** (१), (२), (३) व (४) दि. १३ ऑक्टोबर, २०१४ च्या अधिसूचनेमध्ये झोपडपट्टी पुनर्विकासाच्या बाबीचा समावेश पायाभूत सुविधा क्षेत्राअंतर्गत झालेला नाही.

केंद्र शासनाच्या दि.३० मार्च, २०१७ च्या अधिसूचनेन्वये सामाजिक व व्यावसायिक पायाभूत सुविधा अंतर्गत "परवडणारी घरे" (Affordable Housing) या बाबीचा समावेश करण्यात आलेला आहे.

दि.३० मार्च, २०१७ च्या अधिसूचनेच्या परिणामी अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांकाचा किमान ५०% चटई क्षेत्राचा वापर ६० चौ.मी. पर्यंतच्या चटई क्षेत्राच्या आकारमानाच्या निवासी सदनिकांसाठी होणार असल्यास असा प्रकल्प "परवडणारी घरे" (Affordable Housing) म्हणून गणला जाणार आहे. या बाबीचा समावेश पायाभूत सुविधा क्षेत्राअंतर्गत झाल्याने असा प्रकल्प राबविणाऱ्या विकासकांना/अभिकरणांना वित्तीय संस्थांकडून प्रकल्पासाठी निधी उभारणे शक्य होणार आहे.

-----------------

## मैत्री को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीमधील बेकायदा २९ मजल्यांबाबत

**(२७) * ८५५६२ श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांताकुझ (पूर्व) येथे म्हाडाच्या जमिनीवर मुंबई महानगरपालिकेची परवानगी न घेता बांधण्यात आलेल्या मैत्री को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीमधील कथित बेकायदा २९ मजल्यांबाबत म्हाडाने कंत्राटदाराला नोटिस बजावली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नोटिसीवर कंत्राटदाराने खुलासा सादर केला आहे काय, त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार उक्त कंत्राटदाराविरुध्द कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) (२) व (३) मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांचेकडून प्राप्त अहवालानुसार कोलेकल्याण, सांताक्रुझ (पूर्व) येथील न.भू.क्र. ५६०८/अ या भूखंडावर विनियम १३ (२) अंतर्गत शासनाच्या राजपत्रित अधिकाऱ्यांकरीता बांधण्यात येणाऱ्या इमारतीच्या स्टिल्ट + ३ मजल्यांपर्यंत मुंबई महानगरपालिकेकडून सी.सी. मिळालेली आहे.

तथापि, कंत्राटदार मे.बी. जी. शिर्के कं.प्रा.लि. यांनी सदर इमारतीचे स्टिल्ट+१२ मजल्याचे बांधकाम केले आहे. सदर इमारतीचे महानगरपालिकेने प्रारंभ प्रमाणपत्र (C.C.) नुसार अधिकचे बांधकाम केल्यामुळे मुंबई मंडळामार्फत पत्र क्र. ४९४, दि. ०२.०३.२०१७ अन्वये पहिली नोटीस बजाविण्यात आली होती. तद्नंतर उपरोक्त नोटीशीचा खुलासा सादर केला नसल्याने, कंत्राटदारास दुसरी नोटीस पत्र क्र. ९३८, दि.१२.०४.२०१७ अन्वये देण्यात आली व पुन्हा तिसरी नोटीस पत्र क्र. १७६२, दि. १७.०७.२०१७ रोजी देण्यात आली आहे. सदर इमारतीच्या बांधकामाकरीता मुंबई मंडळामार्फत Stop Notice कंत्राटदार यांना देण्यात आलेली आहे.

सदर इमारत २९ मजल्यांची नसून, स्टिल्ट + १२ मजल्यांचे बांधण्याचे काम अपूर्ण अवस्थेत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वारणानगर (जि.कोल्हापूर) व मिरज (जि.सांगली) येथे पोलिसांनी टाकलेल्या छाप्यातील रक्कमेचा पोलिसांनी अपहार केल्याबाबत

**(२८) * ८७३४२ श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव),**

**श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.हसन मुश्रीफ (कागल), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वारणानगर (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील शिक्षक कॉलनीतील फ्लॅटवर पोलिसांनी टाकलेल्या छाप्यातील सुमारे रूपये ९ कोटी १८ लाख रक्कमेचा पोलिसांनी अपहार केल्याची घटना माहे एप्रिल, २०१७ च्या चौथ्या आठवड्यामध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच बेथेलहेमनगर, मिरज, (ता.मिरज, जि.सांगली) येथेही टाकलेल्या छाप्यात मिळालेल्या रक्कमेचा पोलिसांनी अपहार केल्याची घटना घडल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त घटनांची शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नूसार पोलिसांनी अपहार केलेली रक्कम परत मिळविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच सदर रक्कमेचा अपहार करणाऱ्या पोलिसांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर प्रकरणी कोडोली पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ४८/२०१७ मध्ये रुपये ६ कोटी व गु.र.नं. ४९/२०१७ मध्ये रुपये ३ कोटी १८ लाख असे एकुण ९ कोटी १८ लाख रुपये चोरीस गेल्याबाबत उक्त २ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(२) बेथेलहेमनगर, मिरज (ता. मिरज, जि.सांगली) येथे टाकलेल्या धाडीत एल.सी.बी. च्या पोलीसांनी जप्त केलेली रक्कम ही कोडोली पोलीस ठाणे गु.र.नं. ४१/२०१६ या गुन्हयामध्ये जमा करण्यात आली असून, सदर रक्कम मा. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे फिर्यादी यांना परत देण्यात आली आहे. सदर प्रकरणात ५ आरोपींना अटक करण्यात आली असून, १ आरोपी फरार आहे. उक्त गुन्हयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले असून, फौ.प्र.सं. कलम १७३ (८) अन्वये पुढील तपास चालु आहे.

(३) व (४) होय,

वारणानगर (ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर) येथील शिक्षक कॉलनीतील फ्लॅटवर पोलिसांनी टाकलेल्या धाडीबाबत चौकशी करुन या प्रकरणी एकुण ७ पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्यासह एकुण ९ आरोपींविरुध्द कोडोली पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ४८/२०१७ भा.दं.वि. कलम ४५४, ३८०, १२० (ब), १६६, १६७, ४११, ३४ व गु.र.नं. ४९/२०१७ भा.दं.वि. कलम ४५४, ३८०, १२० (ब), १६६, १६७, ३४ अन्वये उक्त २ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर गुन्हयातील सर्व दोषी पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांना निलंबित करण्यात आले आहे.

सदर गुन्हयांचा तपास रा.गु.अ.वि. कोल्हापूर पथकामार्फत सुरु आहे.

(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## मुंबईतील मालाड मालवणी ते एवरशाईन नगरला जोडणाऱ्या पुलाबाबत

**(२९) * ९३९४१ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मालाड मालवणी ते एव्हरशाईन नगरला जोडणारा पादचारी पूल दोन वर्षापासून तुटल्याने तेथील जनतेला नाल्याच्या पाण्यातून प्रवास करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक नागरिकांनी तसेच लोकप्रतिनिधीनी शासनाकडे व मुंबई महानगरपालिकेच्या मालाड येथील कार्यालयाकडे वारंवार तक्रार करुनसुद्धा कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त ठिकाणी नवीन पूल बांधण्याबाबत वा पुलाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३), (४) व (५) मुंबईतील मालाड-मालवणी ते एव्हरशाईन नगरला जोडणारा पादचारी पूल डिसेंबर, २०१५ मध्ये तुटला हे खरे आहे.

सद्य:स्थितीत मालाड-मालवणी येथून एव्हरशाईन नगर येथे ये-जा करण्यासाठी २.५ ते ३ कि.मी. अंतरावरील वाहनांसाठी असलेल्या मालाड-मार्वे रस्त्यावर असलेल्या येथील पुलावरील पदपथ उपलब्ध आहे.

मालाड मालवणी ते एव्हरशाईन नगरला जोडणारा पादचारी पूल सी.आर.झेड I व II ने बाधीत होत असल्यामुळे, मा. उच्च न्यायालय व पर्यावरण विभागाची माहे मार्च, २०१७ मध्ये परवानगी प्राप्त झाल्यानंतर महानगरपालिकेमार्फत सदर पुलाचे काम माहे एप्रिल, २०१७ पासून सुरु करण्यात आले आहे.

सदर पुलाच्या दोन्ही बाजूकडील पाईल व पाईल कॅपचे काम पूर्ण करण्यात आले असून उर्वरित काम पावसाळयानंतर करण्यात येणार आहे.

सदर पुलाच्या कामासाठी रु. ५.०३ कोटी इतका खर्च अपेक्षित असून, सदर खर्चाची तरतूद सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पामध्ये करण्यात आली आहे.

सदर कामाचा कंत्राट कालावधी पावसाळा सोडून १२ महिने इतका आहे.

-----------------

## अंधेरी (पूर्व) येथील नवदुर्गा सहकारी गृहनिर्माण संस्था या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील १७ रहिवाशी प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे बेघर झाल्याबाबत

**(३०) * ८८६०९ श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (पूर्व) येथील नवदुर्गा सहकारी गृहनिर्माण संस्था या नावाने झोपडपट्टी पुनर्वसन योजना सुरु असून, सदर योजनेमध्ये न.भू.मा.क्र. ४८९, मौजे - गुंदवली या भूखंडावरील १७ झोपडपट्टीधारकांना सन २००६ मध्ये समाविष्ट करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर १७ झोपडपट्टीधारकांचे उपजिल्हाधिकारी (अति.-निष्का.) अंधेरी यांनी परि.-२ बनवून पात्र-अपात्र ही प्रक्रिया पूर्ण करून त्यांना पात्र केले होते व पात्र केल्यानंतर विकासकाने सदर १७ लोकांना संक्रमण शिबिरामध्ये स्थलांतरीत केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १६ जुलै, २०१५ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने सदर १७ लोकांची नावे वगळण्यात आल्याचे संबधितांना कळवून उपजिल्हाधिकारी (अति.-निष्का.) अंधेरी यांनी त्यांना संक्रमण शिबिर खाली करून पूर्वी राहत असलेल्या घरामध्ये जाण्याचे आदेश दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर १७ झोपडपट्टीधारकांची घरे ही विकासकाने रिकामी करून त्याचे निष्कासन केले त्यास १० वर्षाचा कालावधी उलटून गेला असल्यामुळे सदर घरे आता राहण्यायोग्य नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण व विकासक यांनी केलेल्या फसवणुकीमुळे सदर १७ रहिवाश्यांना बेघर व्हावे लागले आहे याकरिता जबाबदार असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांवर तसेच विकासकावर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे, तसेच त्या १७ रहिवाश्यांना घरे देण्याकरिता किंवा त्यांच्या जुन्या घरांची पुनर्बांधणी करण्याकरीता शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१), (२) व (३) अंधेरी (पूर्व) येथे नवदुर्गा सह.गृह.संस्थेच्या नगर भू क्र.४८९,४८९/१ ते १५ व नगर भू.क्र. ४८८,४९८,४८८/१ ते ९३ या दोन मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणात दि. ६/९/२००० रोजी दाखल करण्यात आली होती. सदर योजनेमध्ये एकूण १४४ झोपडीधारकांचा समावेश करण्यात आला होता. मात्र न.भू.क्र. ४८९,४८९/१ ते १५ ही मिळकत खाजगी असल्याने व त्या मिळकतीच्या मालकाची संमती नसल्याने सदर मिळकतीवरील १७ झोपडीधारक यांना वगळून सुधारित १२७ झोपडीधारकांचे परिशिष्ट-२ उपजिल्हाधिकारी (अतिक्रमण) तथा सक्षम प्राधिकारी, अंधेरी यांनी दि.२२.१०.२००१ रोजी निर्गमित केले आहे. योजनेतून वगळण्यात आलेल्या १७ झोपडीधारकांचे संक्रमण शिबीरात वास्तव्य असणे योग्य नसल्याने संक्रमण शिबीरातील सदनिका खाली करण्यासंबंधी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दि.१४/८/२०१५ च्या पत्रान्वये उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) तथा सक्षम प्राधिकारी, अंधेरी-२ यांना कळविले.

(४) सदर १७ झोपडीधारकांच्या झोपडयांपैकी २ झोपडया विकासकाने पुनर्वसन इमारतीच्या बांधकामाकरिता निष्कासित केलेल्या असून उर्वरित झोपडया झोपडीस्थित जागेवर आहेत. परंतु त्या बऱ्याच कालावधीसाठी रिकाम्या असल्याने राहण्यायोग्यते करीता अंशत: दुरुस्ती करण्याची आवश्यकता असल्याचा उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) तथा सक्षम प्राधिकारी, अंधेरी-२ यांचा अहवाल आहे. आवश्यकतेनुसार सदर झोपड्या प्राधिकरणाने स्वत: अथवा विकासकामार्फत निवासयोग्य स्थितीत आणण्याची कार्यवाही करण्यासंदर्भात सूचना देण्यात येत आहेत.

(५) न.भू.क्र.४८९,४८९/१ ते १५ या मिळकतीवरील १७ झोपडीधारकांना योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आलेले नसल्याने त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न उद्भवत नाही, असा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

-----------------

## पाचोरा (जि.जळगांव) येथे पाचशे रुपयांच्या बनावट नोटा छापण्याच्या कारखान्यावर छापा टाकल्याबाबत

**(३१) * ८९६६६ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा (जि.जळगांव) येथे पाचशे रुपयांच्या बनावट नोटा छापण्याच्या कारखान्यावर दिनांक ३० मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास छापा टाकून बनावट नोटा छापण्याचा मोठ्या प्रमाणात मुद्देलमाल जप्त करुन या प्रकरणी एका शिक्षकासह पाच जणांना अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर प्रकरणी दि.३१/०५/२०१७ रोजी ५ आरोपींना अटक करुन त्यांच्याकडून एकूण ७३,९००/- रुपये (रुपये १०० किंमतीचे एकूण ७३९ नग) किंमतीच्या बनावट चलनी नोटा व २७० नग अर्धवट छापलेल्या/प्रिंट केलेल्या बनावट नोटा जप्त केल्या आहेत.

(२) व (३) सदर प्रकरणी एकुण ६ आरोपींविरुद्ध दि. ३१/०५/२०१७ रोजी भडगांव पोलीस स्टेशन, भाग -५ येथे गु.र.नं.६४/२०१७ भा.दं.वि. कलम ४८९(अ) (क) (ड), १२० (ब), ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करुन ५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यामध्ये कोणीही शिक्षक नाही. एक आरोपी फरार असून गुन्हा तपासावर आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेच्या कमला नेहरू रुग्णालयातील अतिदक्षता विभागातील यंत्रणा विनावापर पडून असल्याबाबत

**(३२) * ९३६३८ श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या कमला नेहरू रुग्णालयात करोडो रुपये खर्च करून पाच वर्षांपूर्वी बसवलेली दहा खाटांच्या अतिदक्षता विभागातील यंत्रणा फिजिशियन, डॉक्टरांअभावी विनावापर पडून असल्याची बाब दिनांक १ मे, २०१७ रोजी निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनस्तरावर चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) जनरल फिजीशीयन, आय.सी.यु. फिजीशीयन, इंटेसिव्हिस्ट, कार्डीओलॉजीस्ट, असे तज्ञ डॉक्टर तसेच प्रशिक्षित नर्सिंग स्टाफ व २४ तास प्रयोगशाळा उपलब्ध नसल्याने पुणे महानगरपालिकेच्या कमला नेहरू रूग्णालयातील अतिदक्षता विभाग बंद आहे ही वस्तुस्थिती आहे.

तज्ञ डॉक्टरांच्या पदांवर बंधपत्रित (बॉन्डेड) डॉक्टर्स उपलब्ध करून घेण्यासाठी पुणे महानगरपालिकेमार्फत प्रयत्न करण्यात आले होते. तथापि, अतिदक्षता विभागासाठी आवश्यक असलेले बंधपत्रित तज्ञ डॉक्टर्स उपलब्ध झाले नाहीत.

पुणे महानगरपालिकेच्या वतीने कंत्राटी पध्दतीने जनरल फिजीशीयन व आय.सी.यु. फिजीशीयन नेमण्याकरीता अनेकवेळा वर्तमानपत्रात जाहिरात दिली होती. तथापि, केवळ दोनच फिजीशीयन उपलब्ध होऊ शकले.

अतिदक्षता विभागातील रिक्त पदे भरून अतिदक्षता विभाग सुरू करणेकरिता पुणे महानगरपालिका प्रशासनामार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला शहरातील रेन वॉटर हार्वेस्टिंगसाठी तयार केलेल्या शोषखड्ड्यात दोन बालकांचा पडून मृत्यू झाल्याबाबत

**(३३) * ९१८७३ श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरातील महानगरपालिका शाळा क्रमांक १६ समोर असलेल्या मैदानात रेन वॉटर हार्वेस्टिंगसाठी तयार केलेल्या शोषखड्ड्यांत माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान दोन बालकांचा पडून मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींविरूद्ध पोलिसांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

मात्र उपरोक्त घटना ही दिनांक १४.०८.२०१६ रोजी घडलेली आहे.

(२) व (३) दिनांक १४.०८.२०१६ रोजी ७ वर्षे व १० वर्षे वय असलेली दोन मुले अकोला शहरातील मनपा शाळा क्र. १६ समोरील मैदानातील बांधावर खेळत असतांना तेथे खोदलेल्या शोषखडडयात पाय घसरुन पडल्याने व त्यांना तेथून बाहेर पडता न आल्याने ते पाण्यात बुडून मृत्युमुखी पडले. मृतकांचा पोस्टमार्टम रिपोर्ट प्राप्त झाला असून त्यामध्ये Death due to drowning असे कारण दिले आहे. याप्रकरणी अ.मृ. क्रमांक ३४९/२०१६, भा.दं.वि. कलम ३०४(अ), ३४ प्रमाणे पो.स्टे. खदान, जि.अकोला येथे गुन्हा दाखल करण्यांत आला आहे.

याप्रकरणी दोन आरोपींना दिनांक २७.०५.२०१७ रोजी अटक करण्यांत आली आहे. प्रकरणाचा तपास पूर्ण झाला असून दोनपैकी एक आरोपी हा लोकसेवक (प्राध्यापक) असल्याने कलम १९७ सीआरपीसी प्रमाणे विभागप्रमुखांची परवानगी मिळताच न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यांत येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिपळूण नगरपरिषदेच्या (जि.रत्नागिरी) अधिपत्याखाली असलेल्या बाजारपुलाचे काम अपूर्ण असतांनाही ठेकेदाराला देयके अदा करण्यात आल्याबाबत

**(३४) * ९१५८५ श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण नगरपरिषदेच्या (जि.रत्नागिरी) अधिपत्याखाली असलेल्या बाजारपुलाचे काम अपूर्ण असतानाही नगरपरिषदेकडून ठेकेदाराला पूर्ण कामाचे देयक अदा करण्यात आले असल्याचे माहे मार्च, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाला देण्यात आलेल्या मुदतवाढीमध्येही काम न झालेले असतांनाही ठेकेदाराकडून देय असलेला दंड न आकारता देयक अदा करण्यात आलेले असल्याने नगरपरिषदेचे नुकसान झालेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बाजार पुलाच्या कामामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबतची तक्रार जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडे माहे मार्च, २०१७ मध्ये प्राप्त झाली आहे, हे खरे आहे.

(२) सदर कामाचा त्रयस्त संस्थेमार्फत परिक्षण करण्यात येत असून त्याबाबतचा अहवाल अद्याप प्राप्त झाला नसल्याने नगरपरिषदेने कामाचे अंतिम देयक अद्याप अदा केले नाही. दंड आकारण्याची कार्यवाही अंतिम देयक देण्यापूर्वी करण्यात येणार असल्याचे मुख्याधिकारी, चिपळूण नगरपरिषद यांनी कळविले आहे.

(३) व (४) जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, चिपळूण यांना उक्त बाबींचे चौकशी करण्याचे आदेश दिनांक ०१/०४/२०१७ रोजी दिलेले असून कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, चिपळूण यांचेमार्फत चौकशी सुरु आहे.

याशिवाय नगरपरिषदेने सदर कामाचे त्रयस्त यंत्रणेमार्फत परिक्षण करण्याबाबत अधिक्षक अभियंता, संकल्प चित्र मंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांना कळविले आहे.

-----------------

## गोरेगाव येथील तीन डोंगरी परिसरात विज जोडणीची बनावट पत्रे व बोगस अहवाल तयार करुन बांधकाम परवानग्या मिळविल्या जात असल्याबाबत

**(३५) * ८५०८५ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव येथील तीन डोंगरी परिसरातील भूखंड क्र.४९, ५० व ५५ वरील लाभार्थ्यांना रिलायन्स कंपनीतर्फे पुरविण्यात येणाऱ्या विद्युत प्रवाहाबाबतची विज जोडणीची बनावट पत्रे व बनावट अहवाल तयार करुन त्या आधारे बांधकाम परवानग्या मिळविल्या जात असल्याबद्दल आरटीआय कार्यकर्ते श्री. संतोष पांडे यांनी गोरेगाव पोलीस ठाणे, मुख्यमंत्री कार्यालय, एसआरए कार्यालय, आर्थिक गुन्हा अन्वेषण विभाग इत्यादींकडे पुरव्यासह लेखी तक्रार केल्याची बाब दिनांक १२ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोठया प्रमाणात बनावट लाभार्थींचा भरणा व बनावट झोपडीधारकांची कागदपत्रे एसआरएच्या कार्यालयात सोसायटी व विकासकाच्या प्रतिज्ञापत्रासह दाखल करण्यात आली व त्या बरोबरच विज

जोडणीची बनावट कागदपत्रे व बनावट अहवाल दाखल करण्यात आला याबाबत केलेल्या तक्रारीचा तपास पूर्ण झाला आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पुढे काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) हे खरे आहे.
(२) ओमकार तानाजी नगर, क्रांतीनगर व गणेश एकता नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेचे, पुरवणी परिशिष्ट -२ व आदेश, सचिव, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी, त्यांना कायद्यानुसार प्राप्त अधिकार क्षेत्रात निर्गमित केला असल्याचे त्यांनी अहवालात नमूद केले आहे.

प्रस्तुतचे आदेश हे अर्धन्यायिक स्वरुपाचे असून अपिलास पात्र आहेत. परिशिष्ट-२ मधील झोपडीधारकांच्या पात्रतेबाबत तक्रार असल्यास त्यासाठी महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ चे कलम ३५ प्रमाणे अपिलाची तरतूद आहे. त्यानुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दि.६/२/२०१७ अन्वये श्री.संतोषकुमार रामप्रसाद पांडे यांना प्रस्तुत तक्रारीच्या अनुषंगाने सचिव, झोपुप्रा यांचे परिशिष्ट-२ विरुध्द कलम ३५ नुसार अपिल करणेस कळविलेले आहे.

तसेच तक्रारदाराची प्रस्तुत तक्रार, पुर्नतपासणीच्या अनुषंगाने, शासनाने गठीत केलेल्या, तक्रार निवारण समितीकडे (Grievance Redressal Committee) पाठविण्यात आली असल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे भूखंड महानगरपालिकेने अल्प दराने भाडे तत्वावर दिले असल्याबाबत

**(३६) * ९०४१० श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे भूखंड महानगरपालिकेने भाडे तत्वावर दिले आहेत. तसेच सबंधित जागेचे भाडेकरार सर्वसाधारण सभेत रद्द

करण्यात आले असून सध्या महानगरपालिकेला वर्षाला केवळ ५ लाख ७९ हजार रुपये इतके भाडे मिळते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाजारभावाने विचार केल्यास महानगरपालिकेला या जागेपासून ५ कोटी ९० लाख रुपये इतके भाडे मिळू शकते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभेत सर्व जागांचे भाडे करार रद्द करण्यात आले आहेत, तरी या जागा ताब्यात घेण्यात महानगरपालिका अधिकारी टाळाटाळ करित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने मंजूर केलेला ठराव हा महानगरपालिकेच्या हिताविरुध्द असल्यामुळे सदर ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५१ अन्वये विखंडित करण्यासाठीचा प्रस्ताव महानगरपालिकेने शासनास सादर केला आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे, खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) नगरपरिषदेच्या काळात औरंगाबाद शहरातील विविध ठिकाणी नगरपरिषदेच्या असलेल्या जागा लिज करारनुसार नाममात्र भाडे आकारणी करुन देण्यात आलेल्या होत्या. यामुळे औरंगाबाद महानगरपालिकेस अल्प उत्पन्न मिळत असल्यामुळे त्याबाबतचे सर्व लिज करारनामे रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात आलेला होता. तथापि सदर प्रशासकीय ठरावामध्ये बदल करुन काही लिज धारकांची नावे वगळण्यात आली या कारणास्तव महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने मंजूर केलेला ठराव हा महानगरपालिकेच्या हिताविरुध्द असल्यामुळे सदर ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम ४५१ अन्वये विखंडित करण्यासाठी शासनास प्रस्तावित करण्यात येत आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खुटाळवाडी (ता.शाहुपूरी, जि.कोल्हापूर) येथील पाझर तलावाच्या नुतनीकरणाचे देयक मंजूरीसाठी ठेकेदारांकडून लाच घेताना खनीकर्म अधिकारी व कर्मचाऱ्यांना केलेली अटक

**(३७) * ८७४७७ श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खुटाळवाडी (ता.शाहुपूरी, जि.कोल्हापूर) येथील पाझर तलावाच्या नुतनीकरणाचे देयक मंजूरीसाठी ठेकेदारांकडून रुपये २५ हजारांची लाच घेताना खनीकर्म अधिकारी व त्यांच्या कर्मचाऱ्यांना जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर येथे दिनांक २ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास लाचलुचपत प्रतीबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुसार दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२),(३) व (४) आरोपी लोकसेवक श्री.अभय सुरेश भोगे, खनिकर्म अधिकारी व खाजगी इसम श्री.मोहिते यांच्या विरूद्ध शाहुपुरी पोलीस ठाणे,कोल्हापूर येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ च्या कलम ७,८,१३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी लोकसेवक श्री.भोगे यांना निलंबित करण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.

-----------------

## चारकोप, मुंबई येथील साईधाम नगरातील खारफुटी वाचवण्याच्या प्रयत्नात असलेल्या एका कार्यकर्तीवर गुंडांनी लैंगिक अत्याचार केल्याबाबत

**(३८) * ९२९३१ ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चारकोप (मुंबई) येथील साईधाम नगरातील खारफुटी वाचवण्याच्या प्रयत्नात असलेल्या एका कार्यकर्तीवर झोपडपट्टी गुंडांनी दिनांक २५ जुन, २०१७ रोजी वा त्यासुमारास लैगिंक अत्याचार केल्याची गंभीर घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने आरोपींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) दिनांक २५/६/२०१७ रोजी फिर्यादी महिला यांचे तोंडास जखम झाल्याने पोलीसांनी तीला प्रथम वैद्यकीय उपचार करणेकरीता डॉ बाबासाहेब आंबेडकर रूग्णालयात नेण्यात आले. तदनंतर फिर्यादी ने दिलेल्या तक्रारी वरून आरोपी विरूध्द चारकोप पो स्टे येथे गु.र.क्र २८५/१७ कलम ३५४,३७६(ड), ३२६, १४१, १४३, १४७,१४८ भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल केलेला आहे.

सदर घटनेत एका आरोपीस अटक करण्यात आलेली असून त्यास २६.०७.२०१७ रोजीपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली होती. सध्या त्यास न्यायालयाने ११.०८.२०१७ रोजीपर्यंत न्यायालयीन कोठडीत रवानगी केली आहे. उर्वरीत आरोपींच्या सहभागाविषयी खात्री करून तसेच अंतिम वैद्यकिय अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील अधिक तपास पोलीसांकडून करण्यात येत आहे.

-----------------

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या (जि.ठाणे) शिक्षण मंडळात विद्यार्थ्यांची संख्या वाढवून शैक्षणिक साहित्य व गणवेश खरेदीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(३९) * ८८६०६ श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर महानगरपालिकेच्या (जि.ठाणे) शिक्षण मंडळातर्गत येणा-या शाळांमध्ये सहा हजार पेक्षा कमी विद्यार्थी शिकत असतांना आठ हजार विद्यार्थी संख्या दाखवून गत वर्षीपर्यंत शैक्षणिक साहित्य व गणवेशाची खरेदी करण्यात येत असल्याची गंभीर बाब दिनांक १८ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहारावर अंकुश ठेवण्यासाठी अनुदानाची रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गैरव्यवहाराचा अहवाल महानगरपालिकेने शासनास सादर केला आहे काय,

(४) असल्यास, उक्त गैरव्यवहार प्रकरणी दोषींविरूध्द शासनस्तरावरून काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) "बिंग फुटू नये म्हणून निविदेचा घाट" अशा आशयाची बातमी माहे जुलै, २०१७ मध्ये लोकमत या वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती.

तथापि, उल्हासनगर महानगरपालिकेच्या विविध माध्यमांच्या एकूण २८ प्राथमिक शाळा असून, सदर शाळांमध्ये सन २०१६-१७ मध्ये ७९२८ विद्यार्थी शिकत होते ही वस्तुस्थिती आहे.

(२), (३), (४) व (५) विद्यार्थ्यांच्या गणवेश व इतर शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात रु. २.७७ कोटी इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली होती.

त्यानुषंगाने महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या गणवेश, शैक्षणिक साहित्य संच, बूट-मोजे व रेनकोट पुरवठयासाठी महानगरपालिकेमार्फत कार्यादेश देण्यात आले होते.

त्यानुसार कंत्राटदारांमार्फत उल्हासनगर महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना सन २०१६-१७ मध्ये गणवेश व इतर शैक्षणिक साहित्याचा पुरवठा करण्यात आला आहे.

सन २०१७-१८ मध्ये शैक्षणिक साहित्याची रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यासंदर्भात पालक तथा विद्यार्थ्यांचा प्रतिसाद न मिळाल्यामुळे त्यांच्या बँक खात्यात रक्कम जमा करणे महानगरपालिकेस शक्य झाले नाही.

सन २०१७-१८ मध्ये उल्हासनगर महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थ्यांच्या गणवेश व इतर शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी निविदा मागविण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

-----------------

## मालेगांव (ता.जि.नाशिक) येथे स्थानिक स्वराज्य संस्था अनुदान योजनेतून चंदनपुरी रोड ते आईमरी मंदीर या रस्त्याचे रिसर्फेसिंगचे काम करण्याबाबत

**(४०) * ८८२५५ श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (ता.जि.नाशिक) येथे स्थानिक स्वराज्य संस्था अनुदान योजनेतून चंदनपुरी रोड ते आईमरी मंदीर या रस्त्याचे रिसर्फेसिंगचे काम करण्याकरिता रु. ७५,००,०००/- मंजूर करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असल्याबाबत नागरिकांनी अनेक तक्रारी मालेगांव महानगरपालिका आयुक्तांना देऊनही याबाबत आवश्यक चौकशी करण्यात आली नसल्याने माहे जुन, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असुन त्यांनी उक्त कामाची गुण नियंत्रण विभागाकडून चौकशी करण्याची मागणी करुन चौकशी पुर्ण होईपर्यत कामाचे देयक अदा करु नये अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मालेगाव महानगरपालिकेस दिनांक १६.०१.२०१६ च्या शासन निर्णयान्वये रु.७५ लक्ष इतके रस्ता अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

सदर अनुदानातून महासभा ठराव क्र.१२३, दिनांक १८.०४.२०१६ अन्वये सहा रस्त्यांच्या कामांना मंजूरी देण्यात आली.

त्यामध्ये चंदनपुरी रोड ते आईमरी मंदीर पर्यंत रस्ता रिसर्फेसिंग करणे या रु.१८,५०,०००/- इतक्या रकमेच्या कामाचा समावेश होता.

(२) व (३) सदर काम ई-निविदा प्रक्रिया राबवून दि.२५.०१.२०१७ रोजी पूर्ण करण्यात आले आहे. सदरच्या कामाबाबत अद्यापपर्यंत महानगरपालिकेकडे कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

तथापि, सदरच्या कामाचे त्रयस्थ पक्ष तांत्रिक लेखापरीक्षण शासकीय तंत्रनिकेतन, धुळे यांचेकडून दि.२१.०२.२०१७ रोजी करुन घेण्यात आले आहे. त्यानंतरच याबाबतचे देयक महानगरपालिकेमार्फत अदा करण्यात आलेले आहे. या कामासाठी रु.१८,२७,६३७/- इतका खर्च झालेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्ह्यातील महा ई-सेवा केंद्र चालकाकडून जादा शुल्क आकारण्यात येत असल्याबाबत

**(४१) * ९३३५७ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाऑनलाईन तर्फे चालविण्यात येणाऱ्या महा ई-सेवा केंद्रांना विविध प्रमाणपत्रे देण्यासंदर्भात शासनाने दर ठरवून दिलेले असताना परभणी जिल्ह्यातील अनेक महा ई-सेवा केंद्रचालक विद्यार्थी व नागरिकांना अधिकचे शुल्क आकारत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी परभणीचे तहसीलदार यांच्याकडून चौकशी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची चौकशी पूर्ण झाली आहे काय व त्यानुसार विद्यार्थी व नागरिकांवर जादा शुल्क आकारणाया महा ई-सेवा केंद्रचालकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे अंशत: खरे आहे
(२) होय
(३) व (४) चौकशी दरम्यान एकुण ०६ महा ई- सेवा केंद्र चालक दोषी आढळलेले असून सदर महा ई-सेवा केंद्रे बंद करण्यात आली आहेत. तसेच या विभागाच्या दि.२७.जुलै,२०१६ च्या पत्रानुसार संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्याच्या व आवश्यकता भासल्यास फौजदारी गुन्हे दाखल करुन महा ई-सेवा केंद्रांची परवानगी रदद करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी , परभणी यांना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यातील शिष्यवृत्ती घोट्याळ्यातील तपासणी अधिकारी रविंद्र पाटील यांनी चौकशीमध्ये केलेला गैरव्यवहार

**(४२) * ९३१९२ डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यातील सन २०१४-१५ च्या कोट्यवधी रूपयाच्या शिष्यवृत्ती घोटाळा प्रकरणात तपासणी अधिकारी श्री.रविंद्र पाटील स्थानिक गुन्हे शाखा गडचिरोली यांनी चौकशी करून गुरुसाई, रोहित बोमानवार, समर्थ बालाजी, शालोम व अस्पयर महाविद्यालय तसेच सावित्री बाई फुले व शिवनेरी संस्था यांच्यावार दिनांक ३१ डिसेंबर, २०१४ ते २९ जानेवारी, २०१५ दरम्यान एफ आय आर दाखल केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तपासणी अधिकारी श्री रविंद्र पाटील यांनी चौकशी दरम्यान या संस्था चालकांकडून व अधिकाऱ्यांकडून नाहक पोलिस कारवाईची तसेच अटक करण्याची धमकी देवून मोठ्या प्रमाणात खंडणी वसूल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत मा. मुख्यमंत्री यांना दिनांक २५ ऑक्टोबर, २०१६ रोजी श्री रविंद्र पाटील यांनी पदाचा गैरवापर करून केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करून त्यांना सेवेतून बडतर्फ करण्याबाबत स्थानिक लोकप्रतीनिधी यांनी पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर अधिका-यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) गडचिरोली जिल्हयातील सन २०१४-१५ च्या शिष्यवृत्ती घोटाळा प्रकरणात एकूण ९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर गुन्हयापैकी ८ गुन्हयांचा तपास स्थानिक गुन्हे शाखा, गडचिरोली यांच्याकडे आहे तर १ गुन्हयाचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, गडचिरोली यांचेकडे वर्ग करण्यात आला आहे.
(२) सदर प्रकरणाच्या तपासामध्ये अशी बाब निष्पन्न झालेली नाही.
(३) व (४) होय, हे खरे आहे. सदर अर्जाच्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक यांनी सविस्तर चौकशी केली असता चौकशीअंती अर्जात केलेल्या आक्षेपात तथ्य आढळून आले नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भोगवे (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) गावातील तलाठ्याला लाच घेताना पकडल्याबाबत

**(४३) * ८७१४९ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोगवे (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) गावाचे तलाठी श्री.मिलींद पोटभरे यांना जमीनीच्या फ़ेरफार रजिस्टरमध्ये नोंद घालून ७/१२ च्या प्रती देण्यासाठी लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने त्यांच्या कुडाळ येथील राहत्या घरावर धाड टाकून दिनांक ८ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास रंगेहात पकडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुसार तलाठी श्री.मिलींद पोटभरे यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२),(३) व (४) प्रस्तूत प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंध कायदा सन १९८८ च्या कलम ७,१३,१(ड) सह १३(२)प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून उप विभागीय अधिकारी, सावंतवाडी यांनी आरोपी लोकसेवक श्री.पोटभरे यांना दि.०९/०५/२०१७ पासून निलंबित केले आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

----------------

## पालघर शहरातील १५ इमारती धोकादायक असल्याबाबत

**(४४) * ९३४५८ श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर शहरातील १५ इमारती धोकादायक असल्याचे माहे मे, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारतीची शासनामार्फत पाहणी केली आहे काय, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार पालघर शहरात इमारती पडून जिवित व वित्तहानी होवू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पालघर नगरपरिषदेने नगरपरिषद हद्दीतील धोकादायक इमारतीची माहे एप्रिल मध्ये तपासणी केली असता ७ इमारती धोकादायक असल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) धोकादायक इमारतीच्या मालकांना तसेच भोगवटादारांना इमारती रिकाम्या करण्याबाबत महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक

नगरी अधिनियम, १९६५ च्या तरतूदी अन्वये नोटीशी बजावण्यात आल्या असून, स्थानिक वर्तमानपत्रामध्ये दिनांक ०४/०५/२०१७ रोजी जाहिर सूचना प्रसिध्द केलेली आहे.

तदनंतर मुख्याधिकारी, पालघर नगरपरिषद यांनी दिनांक १३/०७/२०१७ रोजी केलेल्या प्रत्यक्ष पाहणीनुसार सदरहू इमारतीमध्ये पूर्वी ७२ रहिवासी रहात होते. वरील कार्यवाहीमुळे ५४ रहिवाश्यांनी अन्य ठिकाणी स्थलांतर केले असून, सद्यस्थितीत त्या ठिकाणी १८ रहिवासी रहात आहेत. त्यांनी सुध्दा सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित व्हावे, याबाबत नगरपरिषदेकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हयातील कुही येथील ठाणेदार व उपनिरिक्षक यांना लाच घेताना अटक केल्याबाबत

**(४५) * ९२७५४ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील नागपूर उमरेड रोडवर असलेल्या ढाबा मालकाचा मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर दारू परवाणा रद्द झाल्यामुळे त्यांनी रस्त्यापासून ५०० मिटर आतमध्ये विकत घतलेल्या जमिनीवर एका व्यक्तीने हक्क सांगून कुही पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली, या तक्रारीवर कारवाई न करण्यासाठी कुही पोलीस ठाण्याचे ठाणेदार व उपनिरिक्षक यांनी साडेचार लाख रुपयांची लाच ढाबा मालकाकडे मागितली असता दिनांक २७ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास दोन लाख रूपयांची लाच घेताना दोन्ही ठाणेदारास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली असल्याची माहिती निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातील एका ठाणेदाराला लाच घेतांना दुस-यांदा अटक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानुसार शासनाने सदर लाच घेणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३),(४) व (५) आरोपी लोकसेवकाविरूद्ध लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला असून सदर गुन्ह्यात त्यांना अटक करण्यात आली आहे.सदर गुन्ह्याचा तपास सुरू असून आरोपी लोकसेवकास शासकीय सेवेतून निलंबित केले आहे.

-----------------

## लातूर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनात कोट्यवधींचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४६) * ९३६०६ श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनात कनिष्ठ अधिकाऱ्यांनी अधिकार नसताना वाहनधारकांशी करार करुन कोट्यवधी रुपये अदा करणे, ऑनलाईन निविदा न मागवताच कचरा गोळा करणे इ. बाबतीत कोट्यवधींचा गैरव्यवहार केल्याची बाब दिनांक २१ जानेवारी, २०१७ चे सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लेखापरिक्षकांनी डंपिंग ग्राउंडवर टाकण्यासाठी दाखविण्यात आलेला २ कोटी १५ लाख ७१ हजार ६५० रुपयांचा खर्च अमान्य केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आयुक्त किंवा उपायुक्तांनी करारनामे करणे आवश्यक असताना स्वच्छता विभाग प्रमुखांनी व कनिष्ठ अधिकाऱ्यांनी करारनामे करुन मागील साडेचार वर्षात सदर कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

मुख्य लेखा परिक्षक, लातूर शहर महानगरपालिका यांनी त्यांचे दिनांक १२ जानेवारी, २०१६ च्या पत्रान्वये सादर केलेल्या दिनांक १८.१०.२०१५ ते ३१.१०.२०१५ या कालावधीच्या साप्ताहिक लेखा परिक्षण अहवालात अनियमितता झाल्याची बाब निदर्शनास आली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

परिक्षण अहवालात करारनामे आयुक्त/उपायुक्त यांनी करणे आवश्यक असताना कनिष्ठ अधिकाऱ्यांनी केल्याबाबत आक्षेप घेण्यात आला आहे.

(४) लेखा परिक्षण अहवालाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## नेवासा तालुक्यातील (जि. अहमदनगर) सेंट्रल बॅक व उस्थळ दुमाला येथील मीनी बँक या दोन्ही बँकानी मिळून अनेक शेतक-यांची लाखो रूपयांची फसवणूक केल्याबाबत

**(४७) * ९२२३६ श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासा तालुक्यातील ( जि. अहमदनगर ) सेंट्रल बँक व उस्थळ दुमाला येथील मीनी बँक या दोन्ही बँकानी मिळून अनेक शेतक-यांची लाखो रूपयांची फसवणूक केल्याची घटना दिनांक २१ एप्रिल,२०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, या प्रकरणी स्थानिक पोलिस स्थानकांत कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे व किती जणांना अटक केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) होय,

सदर प्रकरणी नेवासा पोलीस स्टेशन, अहमदनगर येथे गु.र.नं.१७८/२०१७ भा.दं.वि.कलम ४२०, ४०६, ३८१, ४६५ अन्वये दि.०५/०४/२०१७ रोजी एका आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात सेंट्रल बँकेचे मॅनेजर यांच्याकडे चौकशी केली असता बँकेतील एकुण ४७ खातेदारांची एकुण १२,८२,९८२/- रुपयांचा अपहार केल्याचे आढळून आले आहे. त्याअनुषंगाने बँकेकडून अधिक पुरावे गोळा करुन आरोपीचा शोध घेण्यात येत असून गुन्ह्याचा तपास चालु आहे.

(४) विलंब झाला नाही.

-----------------

## 'क्राय' या संस्थेच्या पाहणीत राज्यात बाल कामगारांच्या संख्येत वाढ झाल्याचे आढळल्याबाबत

**(४८) * ९३०७३ श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बाल कामगारांच्या संदर्भात क्राय (चाईल्ड राईट्स ॲन्ड यु) या संस्थेने केलेल्या पाहणीत ७,२७,९३२ बाल कामगार आढळुन आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर पाहणीमध्ये बालकामगारांमध्ये वाढ होण्याची मुख्य कारण निरक्षरता हे असल्याचे नमुद केले आहे,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बालकांना कामापासुन दुर ठेवण्यासाठी आणि शिक्षणाची गोडी निर्माण होण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर** : (१) हे खरे नाही.

सन २०११ च्या जन गणनेच्या अहवालानुसार राज्यात ४ लाख ९६ हजार ९१६ बालमजूर म्हणून काम करीत आहेत. परंतु सन २००१ च्या तुलनेत सन २०११ मध्ये कामगारांच्या संख्येत ४.७३% घट झाली आहे. हे खरे आहे.

तथापि, इंग्रजी दैनिक हिंदुस्तान टाईम्स मध्ये दि.१३/०६/२०१६ रोजी चाईल्ड राईट्स ॲन्ड यू (क्राय) या संस्थेच्या अहवालाच्या आधारे या आशयाची बातमी आली होती व त्यावर शासनाने दि.१८/०६/२०१६ च्या पत्रान्वये संपादक, दैनिक हिन्दुस्थान टाईम्स यांना सदर बातमी वस्तुस्थितीवर आधारीत नसल्याचे कळविले आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

तथापि, शासनाने दि.१८/०६/२०१६ च्या पत्रान्वये संपादक, दैनिक हिन्दुस्थान टाईम्स यांना सदर बातमी वस्तुस्थितीवर आधारीत नसल्याचे कळविले आहे.

(३) चाईल्ड राईट्स ॲन्ड यू (क्राय) या संस्थेने केलेल्या पहाणीमध्ये बाल कामगारांमध्ये झपाट्याने वाढ होण्याचे मुख्य कारण निरक्षरता हे असल्याचे नमुद केल्याची बातमी दि.१३/०६/२०१६ रोजीच्या इंग्रजी दैनिक हिंदुस्तान टाईम्समध्ये आली होती, हे खरे आहे.

(४) महाराष्ट्र राज्यात २००५ ते डिसेंबर, २०१६ या कालावधी मध्ये एकूण २४३९ धाडसत्रे घेण्यात आली असून ४०९५ आस्थापनांमधून ६५०६ बाल कामगारांना मुक्त करण्यात आले आहे व २६४६ दोषी मालकांना अटक करण्यात आली आहे.

विविध प्रसिध्दि माध्यमांमार्फत जनजागृती केली जात आहे. बाल मजुरांचे अधिक प्रमाण असलेल्या १५ जिल्ह्यांमधील ३४४ विशेष प्रशिक्षण

केंद्रामध्ये मार्च २०१७ अखेर पर्यंत ८७१२ मुले शिक्षण घेत आहेत. बाल कामगार प्रकल्प सूरु झाल्यापासून एकूण ५९६०० मुलांना शिक्षणाच्या मुळ प्रवाहात आणण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिका हद्दीतील गावांना टँकरद्वारे करण्यात आलेल्या पाणीपुरवठ्यात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४९) * ९४८६१ श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहर महानगरपालिका हद्दीतील गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठ्याचा वर्षाला ४५ लाख रुपये खर्च येत होता परंतु सन २०१५ पासून सदर खर्चात पाच पट वाढ झाल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा खर्च ४५ लाखांवरून २ कोटी ५० लाखापर्यंत गेला असून प्रशासनातील अधिकारी आणि टँकर चालक हे पाणी आजूबाजूच्या बांधकाम व्यावसायिकांच्या बांधकामासाठी वापरत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या अधिकारी व कर्मचारी यांनी टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याच्या बिलामध्ये गैरव्यवहार केला अशा अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) • पुणे महानगरपालिका हद्दीतील ज्या भागामध्ये महानगरपालिकेचे नियमित पाणीपुरवठा होऊ शकत नाही, तसेच देखभाल दुरुस्तीमुळे काही भागांतील पाणीपुरवठा खंडीत झाल्यास अशा ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा करण्यात येतो.

• सन २०१२-१३ पासून सन २०१६-१७ पर्यंतची पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील गावांना टँकरव्दारे केलेल्या पाणीपुरवठ्याच्या खर्चाची माहिती खालील प्रमाणे आहे :-

| अ.क्र. | सन | झालेला एकूण खर्च (रक्कम रुपये कोटीमध्ये) |
|---|---|---|
| १ | २०१२-१३ | २.४६ |
| २ | २०१३-१४ | १.४८ |
| ३ | २०१४-१५ | २.३७ |
| ४ | २०१५-१६ | ३.९२ |
| ५ | २०१६-१७ | ६.५१ |
| एकूण | | १६.७४ |

• सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या कालावधीत पाण्याच्या तुटवड्यामुळे एक दिवस आड टँकरने पाणीपुरवठा करावा लागत होता. त्यामुळे यावर्षी खर्चामध्ये वाढ झाल्याचे दिसून येते.

• तथापि, कोणत्याही बांधकाम व्यवसायिकांच्या बांधकामासाठी पुणे महानरगपालिकेच्या टँकरचे पाणी वापरण्यात येत असल्याची बाब निर्दशनास आली नसल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लोअर परळ डिव्हिजन, डॉ. ई. मोझेस मार्ग, जी/दक्षिण विभाग येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मिळकतीवरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत

**(५०) * ८५३७६ श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोअर परळ डिव्हिजन, डॉ. ई. मोझेस मार्ग, जी/दक्षिण विभाग सी.टी.एस. क्र. १७/४७ (भाग) येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मिळकतीवरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे परिशिष्ट-२ तयार करण्याचे काम सुरु करण्यात आले असता मा. मंत्री, गृहनिर्माण यांच्याकडून दिनांक ०३ जानेवारी, २०१५ रोजीच्या आदेशान्वये सदर सर्वेक्षणाच्या कामास स्थगिती देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ३० ऑक्टोबर, २०१५ रोजी सदरहू स्थगिती आदेश उठविल्यानंतरही आजपर्यंत १५ महिन्यांचा कालावधी लोटला तरी देखील सदरहू सर्वेक्षणाचे काम महानगरपालिकेने सुरु केलेले नसल्याने सुमारे ३००० झोपडपट्टीवासीय हक्काच्या घरांपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदरहू प्रलंबित पुनर्वसन योजनेची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि सदरहु पुनर्वसन योजनेस गती मिळण्यासाठी शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) गृहनिर्माण विभागाच्या दि.३०/१०/२०१५ च्या पत्रान्वये स्थगिती उठविण्यात आली आहे. त्यानंतर दि.८/१२/२०१५ पासून २६४६ झोपडीधारकांच्या सर्वेक्षणाचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे.

उर्वरित १३८३ झोपडीधारकांच्या सर्वेक्षणाचे काम महानगरपालिकेकडून दि.११/७/२०१७ पासून सुरु करण्यात आलेले आहे, असा बृहन्मुंबई महानगरपालिकेचा अहवाल आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई शहरातील धोकादायक इमारतींबाबत

**(५१) * ८६४३० श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई शहरातील एकूण ३१५ इमारती धोकादायक असून त्यापैकी ५२ इमारती अतिधोकादायक असल्याची अधिकृत घोषणा महानगरपालिकेने माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एफएसआय घेऊन इमारतींचा पुनर्विकास व्हावा यासाठी अनेक गृहनिर्माण संस्थांनी संरचनात्मक अहवाल तयार करुन प्रस्ताव सादर केलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, धोकादायक इमारतीमध्ये राहणा-या रहिवाश्यांची पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील धोकादायक इमारतींच सर्वेक्षण करुन सन २०१७-१८ या कालावधीत एकूण ३१५ धोकादायक इमारतींची यादी वर्तमानपत्रात, तसेच महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

(२) होय,

सिडकोने बांधलेल्या व धोकादायक अथवा मोडकळीस आलेल्या इमारतींबाबत शासन अधिसूचना दि.०४/०२/२०१५ नुसार सदर इमारती धोकादायक/ मोडकळीस आलेल्या आहेत, याबाबत निर्णय घेण्यासाठी आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.

सदर समितीसमोर पुनर्बांधणीचे एकूण २० प्रस्ताव सादर झालेले आहेत.

(३) आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या पाहणी समितीपुढे प्राप्त २० प्रस्तावांपैकी पुनर्बांधणीचे १२ प्रस्ताव पात्र ठरविण्यात आले असून ८ प्रस्ताव अपात्र ठरविण्यात आले आहेत.

(४) शासन परिपत्रक, दि.०५/११/२०१५ नुसार जुन्या/मोडकळीस आलेल्या इमारतींबाबत पावसाळ्यापूर्वी करावयाच्या कार्यवाहीबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार खाजगी इमारती/संस्था यांनी धोकादायक इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांची पर्यायी व्यवस्था त्यांनीच करावयाची आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्हयातील यावल वनविभागाचे सहाय्यक वनसंरक्षक सुर्यकांत नाले यांना लाच घेताना अटक केल्याबाबत

**(५२)** * ८९९८३ **श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्हयातील यावल वनविभागाचे सहाय्यक वनसंरक्षक सुर्यकांत नाले यांना १ लाख ८२ हजार रूपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिनांक २६ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास रंगेहाथ अटक केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणात सुर्यकांत नाले यांच्या मालमत्तेची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, अवैधरितीने मालमत्ता संपादित करणाऱ्या व लाच घेणाऱ्या सुर्यकांत नाले यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) आरोपी लोकसेवक श्री.सुर्यकांत नाले यांच्या घरझडतीत सापडलेली रोख रक्कम जप्त करण्यात आली असून त्यांच्या मालमत्तेच्या अनुषंगाने कार्यवाही चालू आहे.

आरोपी लोकसेवक श्री.सुर्यकांत नाले यांना महसूल व वन विभागाने दि.३१/०५/२०१७ च्या आदेशान्वये निलंबित केले आहे.
(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## सीप्झ ते कुलाबा या मेट्रो-३ प्रकल्पाचा सुधारित आराखडा सादर करणेबाबत

**(५३) * ८७३०२ श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सीप्झ ते कुलाबा या मेट्रो-३ प्रकल्पाच्या मार्गातील ५००० झाडांच्या कत्तली व या प्रकल्पास पर्यावरण मंत्रालयाने नकार दिले असतांनाही सागरी हद्द नियंत्रण (सीआरझेड) क्षेत्रात मेट्रो प्रकल्प प्रशासनाने ९ स्थानक उभारावयाचे योजले असून त्यामध्ये कफ परेड येथील स्थानकासाठी "चिल्ड्रन पार्क" संपादित करण्यावरुन मा.उच्च न्यायालयाने दिनांक १२ एप्रिल, २०१७ रोजी एमएमआरडीए आणि मुंबई मेट्रो महामंडळाला सुधारित आराखडा सिध्द करण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पर्यावरण मंत्रालयानेही स्थानक उभारण्यासाठी परवानगी नाकारली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर सुधारित आराखडा एमएमआरडीए आणि मुंबई मेट्रो महामंडळाने तयार करुन मा.उच्च न्यायालयास सादर केला आहे काय व त्याचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबई उच्च न्यायालयाने याचिका क्र.८१४/२०१७ मधील प्रकरणामध्ये दि. १२ एप्रिल, २०१७ च्या आदेशानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला कफ परेड भुयारी मेट्रो स्थानकाच्या जागेबाबत असलेला सुधारीत आराखडा सादर करण्याचे आदेश दिले होते.

(२) मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने भुयारी स्थानकांचे बांधकाम करण्यासाठी आवश्यक असलेल्या वृक्ष तोडीबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाकडून (बी.के.सी. स्थानक वगळता) परवानगी प्राप्त केली आहे. तसेच मुंबई मेट्रो लाईन - ३ प्रकल्पातील एकूण ९ स्थानके सीआरझेड क्षेत्रामध्ये मोडत असून त्यासाठी महाराष्ट्र सागरी किनारपट्टी व्यवस्थापन प्राधिकरण/राज्य स्तरीय पर्यावरणीय आघात मुल्यांकन प्राधिकरण यांच्याकडून सीआरझेड अधिसूचना २०११ नुसार परवानग्या प्राप्त केल्या आहेत.

(३) व (४) सुधारित आराखडयाबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांनी मा. उच्च न्यायालयात शपथ पत्र दाखल केले आहे. त्यानुसार, कफ परेड मेट्रो स्थानकाचे संपूर्ण बांधकाम मुंबई शहराच्या विकास आराखड्यातील ६०.९७ मी. रुंदीच्या प्रकाश पेठे मार्गाच्या हद्दीमध्ये नियोजित असून विकास आराखड्यामध्ये दर्शविलेल्या चिल्ड्रन पार्कची जागा बाधित होत नाही.

-----------------

## चंद्रपूर शहरातील अपूर्ण मल:निस्सारण योजना पूर्ण करणेबाबत

**(५४) * ९३५९३ श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर शहरात मल:निस्सारण योजना कोट्यवधी खर्च करूनदेखील पूर्ण झाली नसल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही योजना आठ वर्षांनंतरही अपूर्ण असल्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त योजनेबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) • केंद्र शासनाच्या युआयडीएसएसएमटी योजनेंतर्गत सन २००७ मध्ये चंद्रपूर शहरासाठी रु.७२.०१ कोटींची मल:निस्सारण योजना मंजूर आहे.

• प्रस्तुत योजनेमध्ये ४५ व २५ एमएलडी क्षमतेचे २ मलशुध्दीकरण केंद्र व १७६ कि.मी.लांबीचे भूमिगत पाईप लाईन टाकण्याचे प्रस्तावित होते.

• प्रस्तावित भूमिगत पाईप लाईनपैकी रेल्वे, वन व पुरातत्व विभागाच्या मान्यतेअभावी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे रस्ते व नदी काठावरील भूमिगत पाईप लाईनसाठी येणारा अधिकचा आर्थिक भार आणि शहरात काही भागातील कमी रुंदीचे रस्त्यांवरील घरांना पोहचणारा धोका विचारात घेऊन ३५ कि.मी ची भूमिगत पाईप लाईन मंजूर प्रकल्पातून वगळण्याचा निर्णय चंद्रपूर महानगरपालिकेने घेतला आहे.

• प्रकल्पामध्ये प्रस्तावित कामांपैकी वगळण्यात आलेल्या कामांचे रु.६.३० कोटी शासनास प्रत्यार्पित करुन चंद्रपूर शहराची उर्वरित मल:निस्सारण योजना पूर्ण केली आहे.

-----------------

## मुंबईतील अंमली पदार्थ विरोधी विभागाच्या कांदिवली युनिटने तरुणांमध्ये नशेसाठी वापरणा-या एलएसडी पेपरची तस्करी करणा-यांना केलेली अटक

**(५५) * ८९४०६ श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अंमली पदार्थ विरोधी विभागाच्या कांदिवली युनिटने तरुणांमध्ये नशेसाठी वापरणा-या एलएसडी पेपरची तस्करी करणा-या दोघांना माहे मे, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दोघांकडून पोलीसांनी २ लाख ३० हजार रुपयांचे एलएसडी पेपर हस्तगत केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने दोषीवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) दिनांक ०१.०५.२०१७ रोजी कांदिवली युनिट अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई यांनी सॅमसन डेन्सन रोझारिओ व रोहन राजु ओवाळ यांचे कडील झडतीत ४६ एल.एस.डी डॉटस पेपर किंमत २,३०,०००/- जप्त करण्यात येऊन त्यांना अटक करण्यात आले आहे. सदर इसमांविरुध्द गु.र.क्र.२६/२०१७ कलम (८) सह २२ (ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ अन्वये न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## कळमनुरी शहरात (जि.हिंगोली) राजपुत स्मशानभूमी ते धोबी घाट पर्यंतच्या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(५६) * ८६८९३ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळमनुरी शहरात (ता.जि.हिंगोली) येथील राजपुत स्मशानभूमी ते धोबी घाट पर्यंतच्या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे स्थानिक नगरसेवक यांनी जिल्हाधिकारी, हिंगोली यांना माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे निदर्शनास आणून दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, सदर रस्त्याच्या कामाच्या दर्जेत सुधारणा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) कळमनुरी येथील राजपूत स्मशानभूमी ते धोबी घाट या रस्त्याच्या कामाची चौकशी करण्याबाबत श्रीमती वनिता गुंजकर, नगरपरिषद सदस्या, नगरपरिषद कळमनुरी यांनी जिल्हाधिकारी, हिंगोली यांना निवेदन दिलेले आहे.

(२) व (३) वरील निवेदनासंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्याचे जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी मुख्याधिकारी, नगरपरिषद कळमनुरी यांना सूचित केले.

सदर रस्त्याच्या कामाचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण शासकीय तंत्र निकेतन, हिंगोली यांच्यामार्फत दिनांक ३ व ४ जून, २०१७ रोजी करण्यात आले आहे.

तांत्रिक परीक्षण अहवालात Satisfactory असा शेरा नमूद असल्याचे व त्यामुळे सदर काम निकृष्ट दर्जाचे झाले नसल्याचे जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी नमूद केले आहे.

या तांत्रिक परीक्षण अहवालात सूचविल्यानुसार रस्त्याच्या दोन्ही बाजूस आवश्यक तेथे भराव टाकण्यात आला असून रोलरद्वारे दाब देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरातील दुय्यम निबंधकासह ७ जणांनी बनावट कागदपत्राद्वारे जमिन विक्री केल्याबाबत

**(५७) * ८९४०२ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील दुय्यम निबंधक ३ नारा व सिताबर्डी मंडळाचे तलाठी, मंडळ अधिकारी व इतर ७ जणांनी माहे मे २०१७ मध्ये वा त्यादरम्यान बनावट कागदपत्रांच्या आधारे एक जमिन विक्री प्रकरणी गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर शहरातील गुन्हे शाखेच्या प्रॉपर्टी सेलने सदर दुय्यम निबंधकासह ७ जणांच्या विरोधात गुन्हे दाखल केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जमिनीचा बाजारभाव ३६ कोटी रुपयांचा असता २३ कोटी ९४ लाख रूपयात जमीनीची विक्री करण्यात आली व सदर दुय्यम निबंधकाच्या संगनमताने शासनाचा महसुल बुडविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने सदर दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३), (४) व (५) सदर प्रकरणी बनावट कागदपत्रांच्या आधारे जमिन विक्री घोटाळा प्रकरणी प्राप्त फिर्यादिस अनुसरुन पोलीस स्टेशन, कोतवाली, नागपूर येथे गुन्हा क्र.७४/२०१७ भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्यात दोन आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याविरुद्ध दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सदर गुन्ह्याचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १७३ (८) अन्वये तपास सुरु आहे.

-----------------

## औरंगाबाद जिल्हयात सेफ सिटी प्रकल्पांतर्गत बसविण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याबाबत

**(५८) * ९४०३० श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयात सेफ सिटी प्रकल्पांतर्गत दोन वर्षापूर्वी २ कोटी रुपये खर्च करुन बसविण्यात आलेल्या ४८ पैकी २८ सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याची माहिती माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील कॅमेरे दुरुस्ती करण्यासाठी पोलिसांनी केलेल्या पत्रव्यवहाराला संबंधित कंपनीकडून कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनस्तरावरुन चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती सीसीटीव्ही कॅमेरे दुरुस्त करण्याबाबत व या दुरुस्तीकडे दुर्लक्ष करणाऱ्या सदरील कंपनीवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) सदरील सीसीटीव्ही कॅमेरे दुरुस्त करुन देण्याबाबत संबंधीत हनीवेल इंटरनॅशनल कंपनीस पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर यांच्याकडून पत्रव्यवहार करण्यात आला होता. त्यानुसार सदर कंपनीने बिघाड झालेले कॅमेरे दुरुस्त केले असून सद्यस्थितीत सर्व सीसीटीव्ही कॅमेरे चालू/कार्यरत आहेत. तसेच सदर कंपनीकडून सीसीटीव्ही कॅमेऱ्यातील तांत्रिक बिघाड दुरुस्तीसाठी एका अभियंत्याची नेमणुक करण्यात आली असून त्यांच्याद्वारे सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची वेळोवेळी दुरुस्ती करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर शहरातील थेट पाईपलाईन योजनेत शासनाने घातलेल्या नविन अटीमुळे महानगरपालिकेवर अधिक आर्थिक भार पडणार असल्याबाबत

**(५९) * ८६३५८ श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील थेट पाईपलाईन योजनेसाठी शासनाने घातलेल्या नविन अटींमुळे महानगरपालिकेवर ४४ कोटी रुपयांचा जादा आर्थिक ताण पडणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा आर्थिक भार शासनाने उचलण्याची मागणी महानगरपालिकेने वारंवार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्याचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) • केंद्र शासनाच्या युआयडीएसएसएमटी योजनेंतर्गत कोल्हापूर शहरासाठी रु.४२५.४१ कोटी किमतीची थेट पाईपलाईन योजना मंजूर करण्यात आली आहे.

• सदर मंजूर योजनेचा मुळ वित्तीय आकृतिबंध ८० टक्के केंद्र हिस्सा, १० टक्के राज्य हिस्सा व १० टक्के महानगरपालिका असा होता.

• तथापि, केंद्र शासनाने युआयडीएसएसएमटी च्या वित्तिय आकृतिबंधामधील केंद्र शासनाचा हिस्सा ६०% इतका कमी केल्याने राज्य शासनाने सदर प्रकल्पासाठी ६०% केंद्र हिस्सा, २०% राज्य हिस्सा, २०% महानगरपालिका हिस्सा असा वित्तीय आकृतिबंध सुधारित केला आहे.

• सुधारित वित्तीय आकृतिबंधामुळे कोल्हापूर महानगरपालिके बरोबर राज्य शासनास सुध्दा रु.४२.५४ कोटी इतका अतिरिक्त हिस्सा उभारावा लागणार आहे, हे खरे आहे.

(२)• सदर प्रकल्पासाठी महानगरपालिका हिश्याची १० % वाढीव रक्कम अनुदान म्हणून मिळणेसंदर्भात शासनास कळविण्याबाबत कोल्हापूर महानगरपालिकेमार्फत ठराव केला आहे.

• तथापि, तशी कोणतीही मागणी कोल्हापूर महानगरपालिकेकडून शासनास प्राप्त झाली नाही.

(३) व (४) केंद्र शासनाने युआयडीएसएसएमटी योजनेसाठी सुधारित केलेल्या आकृतिबंधानुसार (६०:२०:२०) आवश्यक महानगरपालिका हिस्सा कोल्हापूर महानगरपालिकेने स्वउत्पन्नातून उभारणे क्रमप्राप्त आहे.

-----------------

## मौजे ओणीभाटी (ता.दापोली,जि.रत्नागिरी) येथील तरुणाने भडवली येथील जातपंचायतीच्या पुढाऱ्यांकडून मारहाण झाल्यामुळे आत्महत्या केल्याबाबत

**(६०) * ९२२७८ श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे ओणीभाटी (ता.दापोली,जि.रत्नागिरी) येथील तरुणाला भडवली येथील जात पंचायतीच्या पुढाऱ्यांनी मारहाण केल्याने सदर तरुणाने माहे एप्रिल, २०१७ च्या शेवटच्या सप्ताहात आत्महत्या केल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार तरुणाला मारहाण करणाऱ्या जातपंचायतीच्या पुढाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर तरुणाने आत्महत्या केली हे खरे आहे. परंतू, त्यास जातपंचायतीच्या पूढा-यांनी मारहाण केल्याचे निष्पन्न झालेले नाही.

(२) व (३) सदर प्रकरणी दाभोळ सागरी पोलीस ठाणे येथे अकस्मात मृत्यु रजि. क्र. ०४/१७ सी.आर.पी.सी. १७४ प्रमाणे नोंद करण्यात आला होता. चौकशीअंती गु. र. क्र. १७/२०१७ भादवि कलम ३०६, १४१, १४७, १४९, ३४१, ३२३, ५०६ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मोहन श्रीवास्तव कुटुंबाने शेकडो गुंतवणूकदारांना फसवल्याबाबत

**(६१) * ८९४५६ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मोहन श्रीवास्तव कुटुंबाने शेकडो गुंतवणूकदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणुक केल्याची घटना दिनांक २५ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गुंतवणूकीच्या प्रकरणात डॉक्टर व पोलीस यांचाही समावेश असून श्रीवास्तव कुटुंबाविरुध्द आर्थिक गुन्हे शाखेने कारवाई सुरु केली आहे परंतु कारवाई अत्यंत संथगतीने होत असल्याचा आरोप होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास,चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार गुंतवणूकदारांची फसवणुक करणाऱ्या श्रीवास्तव कुटुंबावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२), (३) व (४) सदरहू प्रकरणी वनराई पोलीस स्टेशन येथे गु.नों.क्र. २२३/१६, कलम ४०६, ४०९, ४२०, १२०(ब), भा.दं.वि. सह कलम ३, ४ एम.पी.आय.डी. ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर गुन्हयात दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सदर गुन्हयातील पाहिजे आरोपीची मालमत्ता संरक्षित करण्यात आली आहे. तपासादरम्यान एकुण २९ बँक खाती गोठवण्यात आली आहे. तसेच रोख रक्कम रु. १७,५०,०००/- हस्तगत करण्यात आली आहे. सदर प्रकरणी २ आरोपींविरुद्ध मा.विशेष सत्र न्यायालय, मुंबई येथे प्रथम

दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून सदर गुन्ह्याचा तपास सी.आर.पी.सी. १७३(८) अन्वये सुरु ठेवण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या (जि.ठाणे) रुक्मिणीबाई आणि शास्त्रीनगर रुग्णालयात डॉक्टरांची पदे रिक्त असल्याबाबत

**(६२) * ९२७७३ श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या (जि.ठाणे) रुक्मिणीबाई आणि शास्त्रीनगर या दोन मोठ्या रुग्णालयांसाठी डॉक्टरांची ११५ पदे मंजूर आहेत परंतू त्यापैकी केवळ ५४ पदे भरली गेली आहेत व उर्वरित विशेष तज्ञ डॉक्टरांची ६४ पदे व भूलतज्ञ व शल्यचिकित्सकाच्या ३ जागा रिक्त आहेत असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डॉक्टरांअभावी रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना उपचाराकरिता खाजगी अथवा कळवा -उल्हासनगर आणि मुंबई येथील शासकीय रुग्णालयात पाठविले जाते, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच महानगरपालिकेकडून टिटवाळा येथे वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याची प्रक्रिया दीड वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशतः खरे आहे.
कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या आस्थापनेवर वैद्यकीय अधिकारी यांची एकूण ११५ पदे मंजूर आहेत. सदर पदांपैकी ५४ पदे भरलेली असून ६१ पदे रिक्त आहेत.
उक्त ६१ पदांपैकी ३७ पदे विशेषतज्ञ वैद्यकीय अधिकारी व २४ पदे ही सामान्य वैद्यकीय अधिकारी आणि अपघात कक्ष वैद्यकीय अधिकारी यांची आहेत.

तसेच भुलतज्ञांच्या एकूण ८ मंजूर पदांपैकी ४ पदे रिक्त आहेत. तर शल्यचिकित्सकाच्या ४ मंजूर पदांपैकी ३ पदे रिक्त आहेत.

(२) महानगरपालिकेच्या रुग्णालयात उपलब्ध तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत रुग्णांवर उपचार केले जातात. तथापि, रेडिओलॉजीस्ट व फिजिशियन या पदांवर सद्यस्थितीत तज्ञ उमेदवार उपलब्ध न झाल्याने काही विशेष सुविधा रुग्णालयात उपलब्ध नाहीत. त्यामुळे अतितातडीच्या प्रसंगी I.C.U. व N.I.C.U., सिटी स्कॅन इत्यादीची आवश्यकता भासल्यास प्रथमोपचार देवून, रुग्णास मुंबई व ठाणे येथे पाठविण्यात येते.

(३) व (४) मौजे मांडा-टिटवाळा येथे पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीप तत्त्वावर १०० विद्यार्थी क्षमतेचे वैद्यकीय महाविद्यालय उभारण्याकरीता महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये मान्यता दिली आहे. त्यानुसार आरक्षण क्र.२८ "आयसोलेशन हॉस्पिटल" ही शासन मालकीची आरक्षित असलेली जागा महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## पनवेल तालुक्यातील (जि.रायगड) पेंधर फाटा ते घोटगाव पर्यंतचा रस्ता मेट्रो प्रकल्पामुळे खराब झाला असल्याबाबत

**(६३) * ८६४४९ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल तालुक्यातील (जि.रायगड) पेंधर फाटा ते घोटगाव पर्यंतचा रस्ता मेट्रो प्रकल्पामुळे अतिशय खराब झाला असून सदर रस्त्याच्या नुतनीकरणाचे काम लवकरात लवकर सुरू करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा. व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अत्यंत दुरवस्था झालेल्या या रस्त्याने वाहतूक करणे अतिशय त्रासदायक ठरत असून मोठ्या प्रमाणात वाहतूकीची कोंडी होवून नागरिकांना शारिरिक, मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त परिसरातील नागरिकांनी वारंवार मागणी करूनसुध्दा संबधित प्रशासन जाणून-बुजून दुर्लक्ष करित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने तातडीने चौकशी करून सदर रस्त्याचे नुतनीकरण करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) पनवेल तालुक्यातील पेंधर फाटा ते घोटगांव हा रस्ता पेंधर मार्गे तळोजा फेज-२ मधून जातो. पेंधर गावाजवळच्या उड्डाणापुलालगत ४०० मीटर लांबीचा खराब झालेला रस्ता नवी मुंबई मेट्रो लाईन-१ च्या कामापासून दूर असल्याने उक्त प्रकल्पामुळे सदर रस्ता खराब झाला अशी वस्तुस्थिती नाही.

तथापि, पेंधर फाटा ते घोटगाव या रस्त्यापैकी सिडकोच्या नियंत्रणाखाली असलेल्या ४०० मीटर खराब झालेल्या रस्त्याचे पावसाळ्यामुळे डांबरीकरण शक्य नसल्याने तात्पुरत्या दुरुस्तीचे काम सिडको महामंडळाने हाती घेतलेले आहे. तसेच, सदर रस्त्याच्या दुरुस्ती व डांबरीकरणाचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी विचाराधीन असून निविदा प्रक्रिया अवलंबून पावसाळ्यानंतर रस्त्याच्या दुरुस्ती व डांबरीकरणाचे काम हाती घेण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## निमगाव घाणा (ता. जि. अहमदनगर) येथे गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई करुन गावठी हातभट्टीचा दारु अड्डा उद्‌ध्वस्त केल्याबाबत

**(६४) * ८६२७४ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निमगाव घाणा (ता. जि. अहमदनगर) येथे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई करुन गावठी हातभट्टीच्या दारु अड्ड्यावर कारवाई करुन

एका टेम्पोसह साडेनऊ लाख रुपयांचे कच्चे रसायन, नवसागर, गुळ असा मुद्देमाल जप्त केल्याचे दिनांक १२ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणातील दोषींची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) त्यानुसार दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

सदर कारवाई स्थानिक गुन्हे शाखा व एम.आय.डी.सी. चे पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांनी संयुक्तरीत्या केली असुन, सदर कारवाईत रु. २५,०००/- किंमतीची दारु, रु. १,५५,०००/- किंमतीचे कच्चे रसायन, रु. ७०००/- किंमतीचे बॅरल, रु. ५६००/- किंमतीचे नवसागर व टेम्पो इत्यादी सहित्य जप्त करण्यात आले आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ७३/२०१७ मु.प्रो.कायदा कलम ६५ (ई) (फ) (क) (ड) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात दोन आरोपींना अटक करुन त्यांच्याविरुद्ध मा. न्यायालयात दोषारोपपत्र पाठविण्यात आले आहे.
(४) विलंब झाला नाही.

-----------------

## भोकर (जि.नांदेड) येथील कुंडगुलवार या दाम्पत्याने नागरीकांची फसवणूक केल्याबाबत

**(६५) * ९३३६८ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोकर येथील (जि.नांदेड) विजयकुमार कुंडगुलवार व श्रुतिका कुंडगुलवार या दाम्पत्यांचे विशाल इंटरप्रायझेस नावाचे दुकान असून यांनी भीसी व आरडीच्या नावाखाली गोरगरीब मजूरदार, व्यापारी, नोकरदार यांच्याकडून कोट्यवधी रुपये जमा करुन पलायन केल्याचे दिनांक २९ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त फसवणुकी प्रकरणी सदरील दाम्पत्याविरुध्द पोलीसात गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तद्नुसार सदरील गुन्हेगारांना पकडण्यात पोलीसांना यश आले आहे काय व गुन्हेगारांवर कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच फसवणूक झालेल्या संबंधितांच्या रक्कमा त्यांना परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) सदर प्रकरणातील २ आरोपींनी फिर्यादी व इतर व्यक्तींची भी.सी. व आर.डी. च्या नावाखाली रुपये ३९,४१,७३०/- इतक्या रकमेची फसवणूक केल्याबाबत फिर्यादी यांनी दाखल केलेल्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन भोकर, नांदेड येथे गु.र.नं. १८१/२०१७ भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, ३४ सह एम.पी.आय.डी. ॲक्ट १९९९ चे कलम ३ प्रमाणे दि. २९/०६/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यातील दोन्ही आरोपी अद्याप फरार असून त्यांचा शोध घेण्यात येत आहे. सदर गुन्हा तपासावर आहे.
(५) विलंब झाला नाही.

-----------------

## मालाड (पूर्व) पश्चिम द्रुतगती महामार्गाजवळ असलेल्या ओमकार विकासकाने झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधून हिंदू स्मशानभूमी महानगरपालिकेला हस्तांतरित केली नसल्याबाबत

**(६६) * ८५०३१ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालाड (पूर्व) पश्चिम द्रुतगती महामार्गाला जवळ असलेल्या ओमकार विकासकाच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधून हिंदू स्मशानभूमी

महानगरपालिकेला हस्तांतरित होणे अपेक्षित असताना विकासकाने अद्यापपर्यंत महानगरपालिकेला स्मशानभूमी हस्तांतरित केली नसल्याचे माहे जून, २०१७ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पातील बहुसंख्य पुनर्वसन इमारती पूर्ण झाल्या आहेत तसेच विक्रीसाठी असणाऱ्या सदनिकाही विकल्या गेल्या असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचा प्रकल्प पूर्ण होण्याच्या मार्गी असतानाही अद्यापपर्यंत स्मशानभूमी हस्तांतरित न होण्याची नेमकी काय कारणे आहेत,

(४) असल्यास, स्मशानभूमी महानगरपालिकेला हस्तांतरीत झाली नसतानाही विकासकाला विविध परवानग्या देण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकल्पाची सखोल चौकशी करून विकासकावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) व (२) मे.ओमकार रिअल्टर्स आणि डेव्हलपर्स प्रा.लि.यांचेमार्फत मौजे मालाड (पूर्व) न.भू.क्र.८११अे/७(भाग), ८१२, ८१३, ८१४ए/१ ते ८१४ए/४, ८२१, ८२४, ८२५(पै.) व ८४४, येथील एकूण ५९५९८.९० चौ.मी. क्षेत्रफळाच्या भूखंडावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात येत आहे. त्यापैकी महानगरपालिकेच्या ५९८७.६० चौ.मी. क्षेत्रफळाच्या भूखंडावर स्मशानभूमीचे आरक्षण आहे.

पुनर्वसन इमारत क्र.१ व २ करीता एकूण २३०२ झोपडीधारकांना कायम स्वरुपी सदनिकांचे वाटप करण्यात आले आहे. विक्री घटकाचे अंदाजे ७०% काम पूर्ण झालेले आहे.

(३), (४) व (५) योजनेच्या आशयपत्रातील अटी व शर्तीनुसार योजनेतील विक्री घटकाच्या शेवटच्या २५% बांधकामास परवानगी देण्यापूर्वी सर्व आरक्षणांचे काम पूर्ण करुन महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्यात येतील असा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अनंतवाडी (जि. यवतमाळ) येथील शेतकरी खून प्रकरणातील संशयिताने पोलिस कोठडीत आत्महत्या केल्याबाबत

**(६७) * ९३८३५ श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनंतवाडी (जि. यवतमाळ) येथील शेतकरी खून प्रकरणातील संशयिताने पोलिस कोठडीत आत्महत्या केल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अनंतवाडी, जि. यवतमाळ येथील शेतक-याच्या मृत्यु प्रकरणी संशयीत असलेल्या व्यक्तीने त्याचे गावाचे शिवारात आत्महत्या केली असून त्याने पोलीस कोठडीत आत्महत्या केलेली नाही.

(२) व (३) होय, सदर चौकशीनुसार संशयित व्यक्तीने आत्महत्या केल्या प्रकरणी महागाव पोलीस स्टेशन येथे अकस्मात मृत्यु क्रमांक २६/२०१७ कलम १७४ सीआरपीसी प्रमाणे नोंद करण्यात आली आहे. सदर प्रकरणाचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील बंद कापड गिरण्यांच्या जागेवर उभारण्यात आलेल्या इमारतीमध्ये कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतरच गिरणी कामगारांना घरे देण्याबाबत

**(६८) * ८५३७१ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.संतोष**

**टारफे (कळमनुरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बंद कापड गिरण्यांच्या जागेवर उभारण्यात आलेल्या इमारतीमध्ये कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतरच गिरणी कामगारांना घरे देण्यात येतात तथापि गिरणी कामगार नसतानाही १२०० लोकांना घर देण्याच्या प्रक्रयेत समाविष्ट केल्याचा ठपका सनियंत्रण समितीने ठेवल्याची बाब माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार गिरणी कामगार कर्मचारी निवारा आणि कल्याणकारी संघ यांनी दि. १०.१०.२०१६ रोजीच्या पत्रान्वये संनियंत्रण समितीकडे तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीत सन २०१२ च्या सोडतीमध्ये एकच गिरणी कामगार / वारस दोन घरांसाठी यशस्वी झाल्याची तसेच एका घरासाठी यशस्वी व एकासाठी प्रतिक्षायादीवर असल्याची तक्रार केली होती व अशा एकुण १२२८ गिरणी कामगार / वारस यांची यादीसुध्दा संनियंत्रण समितीपुढे सादर केली होती.

(२) सदरहू तक्रारीनुसार संनियंत्रण समितीला देण्यात आलेल्या एकुण १२२८ गिरणी कामगार / वारस यांच्या यादीतील सर्व गिरणी कामगारांची मुंबई मंडळामार्फत तपासणी करण्यात आली व सदर १२२८ गिरणी कामगारांची यादी विश्लेषणासह संनियंत्रण समिती तसेच गिरणी कामगार कर्मचारी निवारा व कल्याणकारी संघ यांना दिली असून एकही गिरणी कामगार / वारस यांना एकापेक्षा जास्त घराचे वितरण झाल्याचे दिसून येत नाही.

तसेच १२२८ गिरणी कामगार / वारस यांच्यापैकी जे गिरणी कामगार दोनदा यशस्वी झाले आहेत किंवा एक यशस्वी व एक प्रतिक्षा यादीवर आहे अशा दुबार यशस्वी झालेल्या गिरणी कामगार / वारस यांचा अर्ज रद्द करुन प्रतिक्षा यादीवरील गिरणी कामगार / वारस यांना प्राधान्य क्रमांकानुसार सदनिकांच्या वितरणाची कार्यवाही करण्यात आली / येत आहे असे मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांनी कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुण्यातील दोन डॉक्टरांनी स्वस्तात साहीत्य व दुप्पट रक्कम देण्याच्या आमिषाने जनतेची फसवणूक केल्याबाबत

**(६९) * ८५१७३ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यातील डॉ.निरंजन वेताळ जाधव आणि डॉ. गणेश रघुनाथ माने या दोन डॉक्टरांनी स्वस्तात साहित्य व दुप्पट रक्कम देण्याच्या आमिषाने साता-यातील १५१ लोकांची सुमारे साडेसहा कोटी रूपयांची फसवणूक केली असल्याची गंभीर माहिती माहे दिनांक १५ जून २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या गंभीर प्रकरणी संबंधित डॉक्टरांवर सातारा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करून तो हडपसर येथे वर्ग करण्यात आलेला असतांनाही अद्याप तपास करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्‌नुसार याप्रकरणातील तपास कामात दिरंगाई करणाऱ्यांवर व सदर डॉक्टरांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पुण्यातील निरंजन वेताळ जाधव आणि गणेश रघुनाथ माने या दोघांनी सातारा परिसरातील अनेक लोकांची आर्थिक फसवणूक केली असल्याची गंभीर माहिती माहे दिनांक ९.५.२०१७ रोजी निदर्शनास आलेली आहे.

(२), (३) व (४) सदर प्रकरणी दोन आरोपींविरूद्ध सातारा पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.००/२०१७ भा.दं.वि. कलम ४०६, ४२०, ३४ सह आय.टी. ॲक्ट कलम ६६(डी) प्रमाणे गुन्हा दाखल करून नंतर सदरची घटना हडपसर येथे घडली असल्याने पुढील तपासासाठी सदर गुन्हा हडपसर पोलीस स्टेशनकडे पाठवून पोलीस स्टेशन हडपसर येथे गु.र.क्र. ४७१/२०१७ भा.दं.वि. कलम ४०६, ४२०, ३४ व माहीती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ (डी) व एम.पी. आय.डी. कायदा १९९९ कलम ३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचे स्वरूप व व्याप्ती पाहून नंतर सदरचा गुन्हा हडपसर पोलीस स्टेशनकडून आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला आहे. आर्थिक गुन्हे शाखेकडून तपासामध्ये आरोपी व त्यांच्या मालमत्तांचा शोध घेणे, साक्षीदारांचे जबाब घेणे, आरोपींच्या घराची झडती घेणे, आरोपीने फसवणुकीच्या रकमेतून विकत घेतलेल्या फ्लॅटची मुळ कागदपत्रे जप्त करणे वगैरे बाबींचा तपास करण्यात आलेला आहे. तसेच वेगवेगळ्या साक्षीदारांकडे तपास करून त्यांनी गुंतविलेल्या रकमेविषयीची कागदपत्रे प्राप्त करून घेण्यात येत आहेत. सदर प्रकरणाच्या तपासात कोणतीही दिरंगाई झालेली नाही. गुन्हा तपासावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मालाड (पूर्व) मुंबई उपनगरातील, आप्पापाडा आनंदनगर येथील मुख्य नाल्याची संरक्षण भिंत धोकादायक झाली असल्याबाबत

**(७०) * ८९१४१ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालाड (पूर्व) मुंबई उपनगर, प्रभाग क्र. ४२ मध्ये, आप्पापाडा आनंदनगर (संतोषी माता मंदिराकडे) या ठिकाणाहून वाहणा-या मुख्य नाल्याची संरक्षण

भिंत नादुरुस्त व धोकादायक झाली असून यामुळे पावसाळ्यात नाल्याच्या पश्चिमेकडील संरक्षक भिंतीवरील घरे तसेच पुर्वेकडील संरक्षक भिंतीच्या बाजूस असणाऱ्या शेकडो घरामध्ये पावसाचे पाणी शिरून मोठया प्रमाणात हानी होत असल्याने संभाव्य जीवित व वित्त हानी टाळण्यासाठी मुख्य नाल्याचा नादुरुस्त संरक्षक भिंतीचे बांधकाम तातडीने करण्यात यावे अशी मागणी लोकप्रतिनिधींनी मा. पालकमंत्री यांना माहे एप्रिल, २०१७ मध्ये दिलेल्या निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी तातडीने संरक्षक भिंत बांधण्यासाठी मुंबई झोडपट्टी सुधार मंडळातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) तसेच सदरहू भिंतीच्या बांधकामासाठी शासनाने किती निधी उपलब्ध करुन दिला आहे व किती कालावधीत सदरहू भिंतीचे बांधकाम पूर्ण करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) अशा प्रकारची मागणी लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल, २०१७ मध्ये आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे केली आहे ही वस्तुस्थिती आहे.

(२), (३) व (४) मालाड (पूर्व) आप्पा पाडा येथील दुर्गा नगर ते संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या सीमेजवळील देवकु कंपाऊंड येथील स्वामी विवेकानंद शाळेजवळील नाल्याच्या दुतर्फा संरक्षक भिंत बांधण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे:-

• सदर नाला ९७५ मी. लांबीचा असून, त्याचे रुंदीकरण व बांधकामाच्या कामासाठी मे. योगेश कन्स्ट्रक्शन यांना दिनांक ०५.०१.२०१७ रोजी कार्यादेश देण्यात आले असून, सदर कामाची कंत्राट किंमत रु. २५.२६ कोटी इतकी आहे.

• सदर कामाचा कंत्राट कालावधी पावसाळा वगळून १८ महिने इतका आहे.

• सदर नाल्याच्या एकूण लांबीपैकी १४० मी. लांबीच्या नाल्याचे रुंदीकरण व बांधकामाचे काम पावसाळयापूर्वी पूर्ण करण्यात आले आहे.

• सदर नाल्याचा उर्वरित भाग सुमारे ६४२ घरांनी बाधीत असून, त्यांची पात्रता ठरविण्याची कार्यवाही सक्षम प्राधिकरणामार्फत सुरु आहे.

• सदर घरांची पात्रता प्राप्त झाल्यानंतर पी.ए.पी. द्वारे उपलब्ध असणाऱ्या सदनिकांमध्ये त्यांचे स्थलांतरण केल्यानंतर बाधीत घरे निष्कासित करण्यात येणार आहेत व तद्नंतर उर्वरित नाल्याचे रुंदीकरण व बांधकाम पूर्ण करण्यात येणार आहे.

तथापि, सदर मुख्य नाल्यास आप्पा पाडा आनंदनगर येथून येणारा सुमारे ५ फुट रुंदीचा छोटा नाला मिळतो. सदर नाल्याच्या उगमापासून दुतर्फा नाल्याच्या भिंतीला लागून पक्की घरे बांधलेली आहेत.

सदर नाल्यावर स्थानिक रहिवाशांनी लादी कोबाचा स्लॅब टाकला असून, त्याचा वापर पायवाट म्हणून केला जातो. सदर नाल्याच्या पुनर्बांधकामाबाबत लोकप्रतिनिधींमार्फत यापूर्वी करण्यात आलेल्या मागणीच्या अनुषंगाने स्थळनिरीक्षण करण्यात आले.

सदर नाला दाट लोकवस्तीमधून जात असल्यामुळे तेथे आर.एम.सी. चे ट्रक जाऊ शकत नाहीत. तसेच, सदर नाल्याच्या पुनर्बांधणीसाठी नाल्याच्या दुतर्फा असलेली घरे निष्कासित करावी लागत असल्यामुळे सदर नाल्याची साफसफाई करुन आवश्यक ती दुरुस्ती करण्यात आली आहे.

तथापि, सदर नाल्याच्या पुनर्बांधकामासाठी नाल्याच्या दुतर्फा असलेली घरे निष्कासित करणे आवश्यक आहे ही वस्तुस्थिती आहे.

-----------------

## पुणे शहरातून जाणाऱ्या मालकी नसलेल्या राष्ट्रीय आणि राज्य महामार्गावर महानगरपालिकेने कोट्यवधी रुपये खर्च केल्याबाबत

**(७१) * ८४९०२ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातून जाणाऱ्या मालकी नसलेल्या राष्ट्रीय आणि राज्य महामार्गावर पुणे महानगरपालिकेने दहा वर्षात अनियमितपणे १३०० कोटी रुपये खर्च केल्याची बाब दिनांक १९ जून,२०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्ते महानगरपालिकेकडे हस्तांतरित केल्याची कोणतीच नोंद नसून त्याबाबत अधिसूचना ही प्रसिद्ध झाली नसल्याची गंभीर बाब समोर आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे मालकी नसलेल्या रस्त्यांवर महानगरपालिकेने कसा खर्च केला याबाबत शासनस्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१), (२) व (३) • पुणे महानगरपालिकेच्या विकास योजना आराखड्यामध्ये पुणे शहरातून जाणाऱ्या विषयाधीन राष्ट्रीय आणि राज्य महामार्गांचा समावेश आहे.

• महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियमातील तरतुदीनुसार विकास आराखड्यांमध्ये मंजूर झालेल्या रस्त्यांचे विकसन करणे महानगरपालिकेस बंधन कारक आहे.

• उपरोक्त तरतुदीस अनुसरुन सदर रस्त्यांच्या विकसन व देखभाल-दुरुस्तीसाठी पुणे महानगरपालिकेमार्फत आतापर्यंत रूपये १३००/- कोटी खर्च झाला आहे. सदर वस्तुस्थिती पुणे महानगरपालिकेस जून २०१७ मध्ये सादर करण्यात आली आहे.

• तथापि पुणे महानगरपालिकेकडून सदर रस्त्याच्या विकसनाबाबत कोणतीही अनियमितता झालेली नाही कारण पुणे शहरामधील रस्त्याच्या क्षेत्राचे राज्य सार्वजनिक बांधकाम विभाग व केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सन १९६७-६८ पासून पुणे महानगरपालिकेकडे देखभाल व दुरूस्तीसाठी हस्तांतरण झालेले आहे.

• पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील रस्ते राष्ट्रीय व राज्य महामार्ग म्हणून जरी वर्गवारीत असले तरी विकास योजना आराखड्यामधील रस्त्यांचा विकसनाचा व देखभाल-दुरुस्तीचा खर्च पुणे महानगरपालिकेने केलेला आहे.

• पुणे महानगरपालिकेने शहरातील मंजूर विकास योजना आराखड्यातील रस्त्याचे विकसन देखभाल-दुरुस्तीचा खर्च महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अंतर्गत असलेल्या तरतूदीच्या आधारे केलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चांदूरबाजार नगरपरिषद (जि.अमरावती) येथे रस्ते बांधकामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(७२) * ९३९१३ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदूरबाजार नगरपरिषद (जि.अमरावती) येथे रस्ते बांधकामात गैरव्यवहार झाल्याची तक्रार लोकप्रतिनिधींनी सचिव, नगरविकास यांचेकडे दिनांक १८ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) याबाबत चौकशी करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी,अमरावती यांना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## मुंबई शहर व उपनगरातील २४ प्रकल्प झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने रद्द करण्याचा निर्णय घेतल्याबाबत

**(७३) * ८४९१७ श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अजित पवार**

**(बारामती), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये झोपडीधारकांकडून ७० टक्के संमती मिळविल्यानंतर प्राथमिक 'लेटर्स ऑफ इंटेंट' (एलओआय) जारी केल्यानंतर ज्या विकासकांनी गेल्या १० वर्षांपासून विहित कालावधीत योजना पूर्ण केल्या नाहीत असे २४ प्रकल्प झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून रद्द केले असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे तसेच १५० विकासकांना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने कारणे दाखवा नोटीसही बजाविलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रलंबित असलेले कोणकोणते प्रकल्प रद्द करण्यात आले आहेत व हे प्रकल्प वर्षोनुवर्ष प्रलंबित राहण्यामागील नेमकी कारणे काय आहेत तसेच आतापर्यंत किती झोपडपट्टी पुनर्वसन योजना मंजूर आहेत व त्यापैकी किती योजना पूर्ण होऊन किती घरे उपलब्ध झाली आहेत,

(३) असल्यास, हे प्रकल्प प्रलंबित राहिल्यामुळे झोपडपट्टीवासियांना वर्षोनुवर्षे ट्रांझिट कॅम्प व भाड्याच्या घरामध्ये राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पाला मान्यता मिळाल्यानंतर किती कालावधीमध्ये सदर प्रकल्प पूर्ण होणे बंधनकारक असावे याबाबत शासन काही धोरण ठरविणार आहे काय,

(५) असल्यास, ज्या भागामध्ये प्रकल्प रद्द करण्यात आले आहेत त्या ठिकाणी नवीन विकासकांना संधी देऊन सदर प्रकल्प लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी कोणती उपययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) माहे जानेवारी २०१६ ते जून २०१७ या कालावधीत एकूण ४२ विकासकांच्या नियुक्त्या रद्द करण्यात आल्या आहेत.

तसेच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून घेतलेल्या आढाव्यामध्ये १२२ झोपडपट्टी पुनर्वसन योजना रखडल्या असल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यामधील सर्व विकासकांना नोटीसा बजावण्यात येवून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली आहे.

(२) महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम १३(२) अन्वये कार्यवाही करुन ४२ विकासकांच्या नियुक्त्या रद्द करण्यात आल्या आहेत. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत कोणतीही प्रगती केलेली नसणे, पुनर्वसन इमारतीचे बांधकाम पूर्ण न करणे, ट्रान्झीट कॅम्पमध्ये झोपडीधारकांची पर्यायी व्यवस्था न करणे, त्यांना नियमितपणे भाडयाची रक्कम अदा न करणे व प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी कोणताही ठोस प्रयत्न न करणे हे विकासकांच्या नियुक्त्या रद्द करण्याची प्रमुख कारणे आहेत.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून आतापर्यंत १५०९ झोपडपट्टी पुनर्वसन योजना मंजूर आहेत. या योजनांमध्ये एकूण ४,८६,२९८ सदनिका प्रस्तावित असून त्यापैकी १,८१,३१४ सदनिका उपलब्ध झालेल्या आहेत. उर्वरित सदनिकांच्या बांधकामाचे काम प्रगती पथावर आहे.

(३) काही झोपडपट्टी पुनर्वसन योजनांना मंजूरी देऊनही तेथील झोपड्या अजूनही निष्कासित केलेल्या नसून झोपडीधारक आहेत त्याच ठिकाणी वास्तव्य करीत आहेत.

(४) सद्यस्थितीमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस आशयपत्र देताना प्रकल्प पूर्ण करण्यासाठी खालीलप्रमाणे कालावधी निश्चित केलेला आहे.

१) ४००० चौ.मी. पर्यंत क्षेत्र - ३६ महिने

२) ४००१ ते ७५०० चौ.मी. पर्यंत क्षेत्र - ६० महिने

३) ७५०० पेक्षा जास्त चौ.मी. क्षेत्र - ७२ महिने

(५) महाराष्ट्र झोपडपट्टी (सु. नि. व पु.) अधिनियम, १९७१ चे कलम १३(२) अन्वये कार्यवाही करुन नियुक्ती रद्द करुन संबंधित झोपडीधारकांच्या गृहनिर्माण संस्थेस नविन विकासक नियुक्त करणे व त्यांची सक्षमता

तपासून झोपडपट्टी योजनेबाबत विविध परवानग्या नियमानुसार निर्गमित करुन झोपडपट्टी पुनर्वसन योजना लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल, असा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

-----------------

## ठाणे व चंद्रपूर जिल्हयात सुरु असलेल्या बोगस कॉलसेंटरबाबत

**(७४) * ८७३४४ श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरात मोठ्या प्रमाणात बोगस कॉल सेंटर सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०१७ च्या तिसऱ्या सप्ताहामध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून अंबरनाथ येथे माऊंट लॉजीक सोल्युशन या नावाने बनावट कॉल सेंटरच्या फेसबुक पेजची निर्मिती करून माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान ३५० युवकांना चांगल्या नोकरीचे आमिष दाखवून त्यांची आर्थिक फसवणूक करण्याऱ्या १८ आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, पंतप्रधान कौशल्य विकास योजनेतंर्गत रोजगार उपलब्ध करून देण्याच्या नावाखाली देशभरातील हजारो तरूणांना फसवणाऱ्या बल्लारपूर (जि.चंद्रपूर) येथील बोगस कॉल सेंटरवर गुन्हे शाखेच्या (सायबर सेल) पथकाने दिनांक २७ जून, २०१७ रोजी छापा मारून कॉल सेंटर चालविणाऱ्या बिहारमधील दोन सुत्रधारकांना पोलीसांनी अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गंभीर प्रकरणी राज्य शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार संबंधित बोगस कॉलसेंटर चालकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशतः खरे आहे.

सदरहू प्रकरणी ९ आरोपींनी अमेरिकन नागरीकांची फसवणुक केल्याचे निष्पन्न झालेले आहे. परंतु, चांगल्या नोकरीचे अमिष दाखवुन ३५० युवकांची आर्थिक फसवणुक केल्याचे निष्पन्न झालेले नाही.
(२) पंतप्रधान कौशल्य विकास योजनेअंतर्गत नोकरी लावून देण्याचे अमिष दाखवून फसवणूक केल्याप्रकरणी २ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर आरोपी अटकेत आहेत.
(३) सदर प्रकरणी ठाणे पोलीस आयुक्तालयातील अंबरनाथ शहरातील शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. १५५/२०१७, भा.द.वि. कलम ४१९, ४२०, १२० (ब), ४६५, ४६७, ४६८, ४७१ सह माहिती तंत्रज्ञान कायदा २००८ चे कलम ६६ (ब), ६६ (क), ७२ (१), ७५ सह द इंडियन टेलीग्राफ ॲक्ट कलम २५ (अ) प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला असून सदर गुन्हयात ९ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

तसेच पंतप्रधान कौशल्य विकास योजनेतंर्गत नोकरी लावून देण्याच्या अमिषाने केलेल्या फसवणुक प्रकरणी नागपूर शहर पोलीस आयुक्तालय पोलीस स्टेशन सदर गु.र.क्र. २६५/१७ कलम ४१९, ४२०, ४६८,४७१, २०१ भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल असून सदर गुन्हयाचा तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मेट्रो रेलच्या कामामुळे अंधेरी-कुर्ला व वीरा देसाई रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(७५) * ९२६७२ श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील प्रथम वर्सोवा ते घाटकोपर मेट्रो रेलच्या कामामुळे अंधेरी कुर्ला रस्ता व वीरा देसाई रोड या रस्त्यांची दुरवस्था झाली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेने रुपये १४३ कोटींची निविदा मागवून सदर रस्त्यांची संपूर्ण पुनर्बांधणी करण्याचे कार्यादेश दिले असून सदर रस्त्यांची पुनर्बांधणी करण्याचे काम अतिशय संथ गतीने सुरु असून मंजूर आराखडे व अंदाजपत्रकानुसार काम करण्यात येत नाही व सध्या अस्तित्वात असलेल्या सिमेंट काँक्रीटच्या रस्त्यावरच पुन्हा सिमेंट काँक्रीटीकरण करून रस्ता बनविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थायी समितीने मंजूर केलेल्या निविदा व प्रत्यक्ष करण्यात येणारे काम यामध्ये मोठी तफावत असून निविदामध्ये असलेल्या कामाची तरतूद व आता होत असलेल्या कामाची रक्कम यामध्येही मोठी तफावत होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मंजूर आराखडे व अंदाजपत्रकानुसार काम न करता आता अस्तित्वात असलेल्या सिमेंट काँक्रीटच्या रस्त्यावरच सुरु असलेल्या सिमेंट काँक्रीटच्या रस्त्याच्या कामास कोणी मंजुरी दिली व त्या कामास स्थायी समितीची मंजूरी घेतली आहे काय,

(५) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मेट्रो रेलच्या कामामुळे आझाद नगर मेट्रो स्टेशन ते वर्सोवा मेट्रो स्टेशन तसेच अंधेरी-घाटकोपर लिंक रोड (अंधेरी-कुर्ला रोड) या रस्त्यांची दुरवस्था झाली आहे ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, पश्चिम उपनगरातील वीरा देसाई रोड या रस्त्याची मेट्रो रेलच्या कामामुळे दुरवस्था झाली आहे हे खरे नाही.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेने अंधेरी-घाटकोपर लिंक रोडच्या पुनर्बांधणीच्या कामासाठी रीतसर निविदा मागवून एकूण रु. १९३.१७ कोटी रकमेच्या कामाचा कार्यादेश दिनांक २५.११.२०१६ रोजी दिला आहे.

सदर कामाचा कंत्राट कालावधी पावसाळा वगळून २४ महिने इतका आहे.

वाहतुक विभागाकडून दिनांक २०.०३.२०१७ ते ३१.०५.२०१७ इतक्या मर्यादित कालावधीत काम करण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र मिळाल्यामुळे दिनांक ३१.०५.२०१७ नंतर काम बंद करण्यात आले आहे.

तथापि, वाहतुक विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र मिळाल्यास दिनांक ०१.१०.२०१७ पासून सदर रस्त्याचे काम पुन्हा सुरु करण्यात येणार आहे.

पश्चिम उपनगरातील अंधेरी (पूर्व) येथील मॅजिक ब्रीक मेट्रो स्टेशन ते मिठी नदी पर्यंतचा ४ कि.मी. लांबीचा सदर रस्ता रहदारीचा आहे.

पूर्व उपनगरातील एन विभागातील अंधेरी-घाटकोपर रस्त्याच्या रुंदीकरणात बाधीत होणारी प्रार्थनास्थळे स्थलांतरीत करण्यास वेळ लागत आहे. तसेच संरक्षण विभागाची जागा बाधीत होत असल्याने काम संथ गतीने सुरु आहे.

(३), (४) व (५) आझाद नगर मेट्रो स्थानक ते वर्सोवा मेट्रो स्थानक, अंधेरी स्थानक (पू) ते पश्चिम द्रुतगती मार्ग तसेच मिठी नदी ते घाटकोपर हे तीन रस्ते मंजुर आराखडे व अंदाजपत्रकानुसार संपूर्ण खोदकाम करुन करण्यात येत आहेत.

तथापि, स्टॅक समितीच्या सल्ल्यानुसार व सक्षम अधिकाऱ्याच्या मंजूरीने पश्चिम द्रुतगती मार्ग ते मिठी नदी या रस्त्याचे काम खोदकाम न करता, काँक्रिटवर नव्याने सिमेंट काँक्रिटीकरण करुन करण्यात येत आहे.

काँक्रिटवर नव्याने सिमेंट काँक्रिटीकरण या पध्दतीमुळे मंजूर निधीपेक्षा कमी निधी खर्च होणार आहे. तसेच त्यामुळे रस्ता तयार करण्यास लागणारा कालावधी व लोकांची गैरसोय कमी होणार आहे.

तथापि, मंजुर झालेल्या रकमेत वाढ न झाल्यामुळे तसेच सक्षम अधिकाऱ्याची मंजूरी घेतली असल्यामुळे त्यास स्थायी समितीची मंजुरी घेण्यात आलेली नाही.

-----------------

## महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड अंतर्गत मंजूर झालेल्या रत्नागिरी जिल्हयातील कामांच्या निविदा प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(७६) * ९१६११ श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड अंतर्गत मंजूर झालेल्या रत्नागिरी जिल्हयातील कामांच्या निविदा स्थानिक वृत्तपत्रांमध्ये कुठेही प्रसिध्द न करता कार्यकारी अभियंता, शाखा अभियंता व ठेकेदार यांनी संगनमताने कामांचे वाटप करून निविदा प्रक्रियेत प्रचंड गैरव्यवहार केल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी बंदर विकास राज्यमंत्री व पालकमंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) याबाबत कोणतीही तक्रार महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडे प्राप्त झालेली नाही.

रत्नागिरी जिल्हयातील कामांच्या निविदा ह्या शासन निर्णयानुसार कामांच्या मुल्यांकन प्रमाणे जिल्हा माहिती अधिकारी, विभागीय उपसंचालक व जाहिरात संचालक (मुख्यालय) यांना कळविण्यात येऊन त्याप्रमाणे स्थानिक वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वांद्रे पश्चिम (मुंबई) येथील लिंकींग रोडवरील महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागाच्या अखत्यारीत असलेले भूखंड बॉम्बे एज्यूकेशन ट्रस्ट या संस्थेला दिल्याबाबत

**(७७) * ८५२७५ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे पश्चिम (मुंबई) येथील लिंकींग रोडवरील १७५१.६६ चौ.मी.चा भूखंड नं.४२६ व ४२७ हे महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागाच्या अखत्यारीत असलेले भूखंड बॉम्बे एज्यूकेशन ट्रस्ट या संस्थेला दिनांक ५ ऑगस्ट, १९९४ मध्ये काही अटी व शर्तीनुसार भाडेपट्टयाने देण्याचा निर्णय घेतल्यानंतर सदर संस्थेने दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ पर्यंत अटी व शर्तीचे पालन न केल्याने सदर भूखंड दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ रोजी पश्चिम विभागाच्या सहाय्यक आयुक्तांनी सिल करुन ताब्यात घेण्याची कारवाई केली असल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानंतर पालिका आयुक्तांनी उपायुक्त सुधार यांना आदेश देऊन १७ लाख ६५ हजार १५७ रुपये ट्रस्टला दंड आकारुन सदर भूखंड परत संबंधित ट्रस्टच्या ताब्यात दिला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लिंकींग रोडवरील कोट्यवधी रुपये किंमतीचा हा भूखंड बॉम्बे एज्यूकेशन ट्रस्टने सलग २१ वर्षे ताब्यात ठेवून त्याचे प्रतिवर्षी होणारे भाडे वेळेत न भरणे, मुंबई महानगरपालिकेशी केलेल्या अटी व शर्तीचे उल्लंघन करुनही प्रशासनाने तो ताब्यात घेतल्यानंतरही स्वत:च्या अधिकाराचा गैरवापर करुन आयुक्तांनी तो संबंधित शिक्षण संस्थेला परत देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर भूखंड परत देताना घातलेल्या नवीन शर्ती व अटी कोणत्या आहेत,

(५) असल्यास, याबाबत चौकशी करुन दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे आहे.

तथापि, सदर प्रकरणी महानगरपालिकेमार्फत बॉम्बे एज्युकेशन ट्रस्ट यांचेकडून रु. ५,१२,४००/- इतके थकीत मक्ता भूभाडे व रु. १२,५२,७५७/- इतके दंडनीय शुल्क असे एकूण रु. १७,६५,१५७/- वसुल करण्यात येऊन सदर भूखंड बॉम्बे एज्युकेशन ट्रस्टच्या ताब्यात दिला आहे.

(३) सदर प्रकरणी दिनांक २४.०६.२०१६ रोजी उपायुक्त(सुधार) यांनी कारणमिमांसेसहित पारीत केलेल्या सुनावणी आदेशानुसार, बॉम्बे एज्युकेशन ट्रस्ट यांना सदर भूभाग पुन्हा देण्याची मुख्य कारणे खालीलप्रमाणे आहेतः-

• सदर भूभाग अतिक्रमित असल्याने महानगरपालिकेने अतिक्रमणे हटविण्याकरिता बॉम्बे एज्युकेशन ट्रस्ट यांनी महानगरपालिकेविरुध्द मा. उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली होती.

• बॉम्बे एज्युकेशन ट्रस्ट यांना दि. ०१.०७.२०१३ रोजी मक्ता कराराच्या अटी व शर्ती भंगाबाबत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. परंतु ट्रस्टला सुनावणी देऊन त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली नव्हती.

• सदर भूखंड परत घेण्यासंबंधीचा ठराव सुधार समिती/महानगरपालिकेकडे सादर करण्यात आला नव्हता. तसेच, अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही न करता महानगरपालिकेने मक्ता करार रद्द केल्यास, सदर प्रकरण महानगरपालिकेच्या विरोधात जाऊ शकले असते.

• सबब, बॉम्बे एज्युकेशन ट्रस्टला प्रत्यक्ष सुनावणीसाठी बोलावून त्यांचे म्हणणे सादर करण्याची संधी देण्यात आली.

• सदर सुनावणीदरम्यान ट्रस्टतर्फे उपरोक्त कारणे दाखवा नोटीस व भूखंड परत घेण्याची कार्यवाही मागे घेतल्यास भूखंडाचे प्रलंबित भाडे देण्याचे तसेच विशिष्ट कालावधीत भूखंड विकसित करण्याचे व प्रलंबित याचिका मागे घेण्याचे प्रस्ताविल्याने, त्यांना अंतिम संधी देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

(४) बॉम्बे एज्युकेशन ट्रस्ट यांना खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून सदर भूखंड महानगरपालिकेमार्फत परत देण्यात आला आहे:-

• सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) त्यांचे दिनांक २९.१०.२०१५ रोजीचे कारणे दाखवा नोटीस मागे घेतील.

• सुनावणी आदेश प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत सहाय्यक आयुक्त (एच/पश्चिम) यांच्याकडून सदर भूभागाचा ताबा प्राप्त करुन सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) सदर भूभागाचा ताबा बॉम्बे एज्युकेशन ट्रस्ट यांना देतील.

• बॉम्बे एज्युकेशन ट्रस्ट ७ दिवसांमध्ये सर्व थकित शुल्काचा भरणा महानगरपालिकेस करतील.

• बॉम्बे एज्युकेशन ट्रस्ट हे दावा क्र. १४९१/२०१३ एक महिन्यात मागे घेतील.

• बॉम्बे एज्युकेशन ट्रस्ट हे सदर भूभाग महानगरपालिकेच्या शिक्षण विभाग, इमारत प्रस्ताव विभाग, मालमत्ता विभाग व इतर संबंधित विभागांच्या परवानग्या प्राप्त करुन, वाटप करण्यात आलेल्या उद्देशाकरीता इमारत प्रस्ताव विभागाकडून, बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या दिनांकापासून २४ महिन्यांच्या आत विकसित करतील.

• बॉम्बे एज्युकेशन ट्रस्ट हे उपरोक्त अटींचे पालन करण्यात अपयशी ठरल्यास, मक्ता करार रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव सुधार समिती व महानगरपालिकेला सादर करण्यात येईल व सदर भूभागाचा ताबा पुन:श्च प्राप्त करण्यात येईल.

• सदर सुनावणी आदेश मान्य असल्याबाबतचे नोंदणीकृत शपथपत्र बॉम्बे एज्युकेशन ट्रस्ट महानगरपालिकेस सादर करतील.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद महानगरपालिकेने शहर विकास आराखड्यानुसार केसरसिंग पुरा उद्यानासाठी आरक्षित असलेल्या भूखंडाबाबत

**(७८) * ९०६२० श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेने शहर विकास आराखड्यानुसार केसरसिंग पुरा येथील ११ हजार चौरस भूखंड सन १९९१ मध्ये उद्यांनासाठी आरक्षित ठेवला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९९८ मध्ये महानगरपालिकेने या जागेचे रितसर भूसंपादन करून २२ लाख रुपये चेकमार्फत जागा मालकास प्रदान केले व त्यांनी महानगरपालिकेला नोंदणी करून दिली परंतु महानगरपालिकेने नोंदणीच्या आधारे ७/१२ उताऱ्यावर महानगरपालिकेचे नाव लावले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सबंधित भूखंडाची फाईल महानगरपालिकेच्या कार्यालयातून गहाळ झाली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सबंधित भूखंड भू-माफियांनी आधिकाऱ्यांशी संगनमत करुन एका महिलेच्या नावावर करून विकला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय. केसरसिंगपुरा येथे सन १९७५ च्या मंजूर विकास योजनेनुसार उद्यान हे आरक्षण होते. मात्र सदर भागाच्या सन २००२ मध्ये मंजूर केलेल्या सुधारीत विकास योजनेत या आरक्षणाचा समावेश आहे. या आरक्षीत जागेमध्ये न.भू.क्र. १८०८८ व १८०८९ चा समावेश आहे.
(२) आरक्षणाखालील न.भू.क्र. १८०८८ व १८०८९ क्षेत्र अनुक्रमे ५१४ चौ.मी. व ५८८.२० चौ.मी. खालील जागा खाजगी वाटाघाटीने संपादित करण्यात आली. महानगरपालिकेने या जागेचे खरेदी खत केले असून त्याआधारे दि. ०५/०४/२०१७ रोजी दोन्ही भूखंडाची नोंद महानगरपालिकेचे नांवे पी.आर. कार्ड वर झाली आहे.
(३) नाही.
(४) नाही. पी. आर. कार्डवर महानगरपालिकेचे नांव आहे.
(५) व (६) लागू नाही.

-----------------

## उल्हासनगर येथील कॅम्प नं. ५ येथील खडी मशीन भुखंडावर घनकचरा टाकण्यात येत असल्याबाबत

**(७९) * ८८७१५ श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर येथील म्हारळगावचे डंपिंग ग्राऊंड ओव्हरफ्लो झाल्यामुळे ते बंद केल्यावर कॅम्प नं. ५ येथील खडी मशीन भुखंडावर घनकचरा टाकण्याचा निर्णय महानगरपालिकेने मागील वर्षापासून घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खडी मशीन ग्राऊंडवरील कचरा जाळल्यामुळे होणा-या धुराने परिसरातील नागरिकांच्या आरोग्य व जीवितास धोका निर्माण झाल्याने तेथे कचरा टाकणे बंद करायची मागणी स्थानिक नागरिकांनी महानगरपालिकेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गंभीर प्रक्ररणाची माहिती महानगरपालिकेने शासनास दिली आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रश्न सोडविण्याबाबत कोणती उपाययोजनात्मक कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सन १९९६-९७ पूर्वी शांतीनगर येथील जागेचा डंपिंग ग्राऊंड म्हणून उल्हासनगर नगरपालिकेमार्फत वापर करण्यात येत होता. तथापि, सन १९९६-९७ पासून शांतीनगर येथील डंपिंग ग्राऊंडवर कचरा टाकण्यात येत नसून तो राणा ट्रेडींग कंपनी जवळ म्हारळ गांव जवळील डंपिंग ग्राऊंडच्या जागेत टाकण्यात येत होता.

परंतु सदर डंपिंग ग्राऊंडची क्षमता संपल्याने दुसरा पर्याय उपलब्ध नसल्यामुळे दिनांक ०३.१०.२०१६ पासून खडी मशिन, गायकवाड पाडा येथील पडीत खाणीत कचरा टाकण्यात येत आहे.

(२) याबाबतची मागणी विविध राजकीय पक्षांनी लेखी निवेदने व मोर्चा यांद्वारे केली आहे.

(३), (४) व (५) उल्हासनगर महानगरपालिकेकडून शहरातील पूर्ण कचऱ्याची शास्त्रीय पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई यांच्यामार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल (डी.पी.आर.) तयार करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

कचऱ्यावर प्रक्रिया करण्याकरिता महानगरपालिकेस जागा उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## वीर नरीमन भाट नगर, वरळी गाव (मुंबई) येथे चौपाटीची निर्मिती करण्याबाबत

**(८०) * ८६०५६ श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी गाव (मुंबई) किनाऱ्याला दरवर्षी लाखो देशी-विदेशी पर्यटक भेट देत असल्याने वीर नरीमन भाट नगर येथे चौपाटीची निर्मिती करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ११ एप्रिल, २०१७ रोजी लेखी निवेदनाद्वारे मा. पर्यटन मंत्री महोदयांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने वीर नरीमन भाट नगर येथे चौपाटीची निर्मिती करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशा प्रकारचे निवेदन पर्यटन विभागास प्राप्त झाले आहे ही वस्तुस्थिती आहे.

(२) वीर नरीमन भाट नगर येथे चौपाटीची निर्मिती करण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेचे कोणतेही धोरण नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ नगरपरिषदेत टँकरने करण्यात आलेल्या पाणी पुरवठ्यामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(८१) * ९०९४९ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ नगरपरिषदेचे विद्यमान मुख्याधिकारी श्री सुदाम धुपे यांच्या कारकीर्दीत मागील उन्हाळ्यात तीन महिने टँकरने करण्यात आलेल्या पाणी पुरवठ्यामध्ये ७० लाखांचा गैरव्यवहार झाल्याची बाब माहे एप्रिल, २०१७ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची लेखी तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी यवतमाळ जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चार कंत्राटदारांना ९१ दिवस ३१ टँकर २५०० प्रमाणे कोणतेही काम न करता व देयकाची शहानिशा न करता देयके अदा करण्यात आलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषी अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) स्थानिक लोकप्रतिनिधींनी पाणी पुरवठा विभागामार्फत कंत्राटी पद्धतीने टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात अनियमितता झाल्याची तक्रार जिल्हाधिकारी यांचेकडे दि. १८.४.२०१७ च्या पत्रान्वये केली, हे खरे आहे.

(३) व (४) जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणी केलेल्या चौकशीनुसार नगरपरिषदेने पाणी पुरवठा करणेकरिता ई-निविदा प्रक्रिया न राबविता मागील वर्षातील मंजूर दराने त्याच कंत्राटदाराना टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यास मंजूरी दिली असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच कंत्राटदाराने पाणी पुरवठा कोणत्या वाहनाद्वारे केला याची शहानिशा न करता रू. ७०.५२ लक्ष ची देयके अदा केल्याचे निदर्शनास आले. संबंधित नगरपरिषद कर्मचारी निलंबित असून तत्कालीन मुख्याधिकारी यांच्यावर विभागीय चौकशीची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर शहरातील थेट पाईपलाईन योजनेत झालेला गैरव्यवहार

**(८२) * ८६३६१ श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील थेट पाईपलाईन योजनेच्या टेंडरमध्ये किरकोळ खर्चानुसार बिले अदा करण्यात येत असून याबाबतची उच्चस्तरीय समिती नेमून चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री यांच्याकडे माहे एप्रिल,२०१७ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काळम्मावाडी (कोल्हापूर) धरण परिसरात बांधण्यात येणा-या जॅकवेल उभारणीसाठी वाढीव दहा कोटीचा खर्च दाखविल्याचे निदर्शनास आल्याने महानगरपालिकेने ठेकेदार जीकेसी इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीला आरसीसी कामांचे पुन्हा डिझाइन करण्याची नोटिस बजावली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेच्या खर्चाच्या तफावतीबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे त्यानुसार जबाबदार असणा-या दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) कोल्हापूर शहरात मंजूर असलेल्या काळम्मावाडी थेट पाईपलाईन योजनेतील किरकोळ कामांच्या बिलाबाबत व झालेल्या कामाची चौकशी करणे, योजनेचे अंदाजपत्रक सुधारित करणे तसेच वन विभागाला द्यावयाची रक्कम कमी करणे इ. बाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०१७ मध्ये निवेदन दिले आहे, हे खरे आहे.

(२) (३) (४) • सदर प्रकल्पाच्या कामाचे ठेकेदार जीकेसी प्रोजेक्ट्स लि. यांनी प्रकल्पातील जॅकवेलसाठी सादर केलेल्या आर.सी.सी. कामाचे डिझाईन तपासले असता स्विकृत निविदेतील काँक्रिट व स्टीलच्या परिमाणात वाढ होत असल्याचे व त्यामुळे खर्चात वाढ होत असल्याचे कोल्हापूर महानगरपालिकेच्या निदर्शनास आले आहे.

• त्यामुळे, स्विकृत निविदेतील आर.सी.सी. डिझाईनच्या अनुषंगाने असलेल्या अटी व शर्तीनुसार शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांच्याकडून डिझाईन तपासून घेऊन अंतिम करण्यात येणार आहे.

-----------------

## हवेली येथील (ता.वाघोली जि.पुणे) जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षकाने अधिकाऱ्यांच्या छळामुळे आत्महत्या केल्याबाबत

**(८३) * ८९४५२ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवेली येथील (ता.वाघोली, जि.पुणे) जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षक श्री. जिवन वाघमारे यांनी गट शिक्षणाधिकारी ज्योती परिहार यांच्या त्रासाला कंटाळुन आत्महत्या केल्याची बाब दिनांक २५ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गट शिक्षण अधिकारी ज्योती परिहार यांच्यावर अहमदनगर जिल्हयातील कर्जत पोलीस स्टेशन मध्ये दिनांक २६ एप्रिल २०१७ रोजी वा त्यासुमारास कलम ३०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाघमारे यांनी अनधिकृत शाळा बंद करण्याच्या प्रशासकीय कारवाईत सहकार्य केले नसल्याने त्यांना काही दिवसांपूर्वी नोटीस पाठविण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(४)असल्यास, याप्रकरणाची सखोल चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर प्रकरणी दोषी असणा-या अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) होय, सदर चौकशीनुसार गट शिक्षण अधिकारी, तालुका हवेली, जि. पुणे या त्यांच्या टिमसह दगडखान वस्ती येथील रेगे शाळा ही अनधिकृत असल्याने पालकांनी आपल्या मुलांना शाळेत पाठवू नये हे सांगण्यासाठी शाळेवर गेले असता तेथे काही लोकांनी गट शिक्षण अधिकारी यांची गाडी अडवली व गोंधळ घातला होता. सदर रेगे शाळे विरुद्ध तक्रार

देण्याबाबत गट शिक्षण अधिकारी, हवेली यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाघोली, जि. पुणे येथे कार्यरत असलेल्या शिक्षकास वेळोवेळी त्रास दिल्याने सदर शिक्षकाने आत्महत्या केल्याचे निष्पन्न झाले आहे. याबाबत कर्जत पोलीस स्टेशन येथे गु. र. क्र. १२७/२०१७ भादंवि कलम ३०६ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर गुन्हयात आरोपी असलेल्या गट शिक्षण अधिकारी यांनी मा. उच्च न्यायालयाकडून अटकपुर्व जामिन मिळविला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सुरु आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि. रायगड) तालुक्यातील मौजे धेरंड व माणकुळे या खाडी किनाऱ्यावरील गावांना जेट्टीची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(८४) * ८६७२३ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग (जि. रायगड) तालुक्यातील मौजे धेरंड व माणकुळे या खाडी किनाऱ्यावरील गावांना जेट्टीची सोय उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा. राज्यमंत्री, बंदरे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मौजे धेरंड व माणकुळे या दोन्ही गावांदरम्यान मोठी खाडी असून येण्या-जाण्यासाठी गत अनेक वर्षापासून छोटया होडीने अतिशय धोकादायक प्रवास करावा लागत असून ओहोटीच्या वेळेस लहान मुले, स्त्रीया व वृध्द व्यक्तींना चिखलातून मार्ग काढावा लागत आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त गावांचे अंतर होडीने पार केल्यास दहा मिनिटे तर वाहनाने पार करण्यास एक तासाचा कालावधी लागत असून लाखो लिटर इंधनही वाया जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त ठिकाणी जेट्टीची सोय उपलब्ध केल्यास लहान मुले, स्त्रीया व वृध्दांना होडीतून काठावर येणे सुलभ होऊन वाहनाला लागणारा इंधन खर्चही कमी होऊन वेळेची बचत होईल, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने चौकशी करून उक्त ठिकाणी जेट्टीची सोय उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) होय, हे खरे आहे.

(५) व (६) मौजे धेरंड व मौजे मानकुळे या खाडीवर सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत खाडीपुलाचे काम पूर्ण झाले आहे. परंतु गावकऱ्यांची सदर पुलास जोडणाऱ्या जोडरस्त्यास विरोध दर्शविल्यामुळे जोडरस्त्याचे काम सुरु झालेले नाही. तसेच जोडरस्ता तयार करण्याच्या जागेत खारफुटीची झाडे असल्याने त्यासाठी पर्यावरण विभागाचा ना-हरकत दाखल प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. तुर्तास गावकऱ्यांची गैरसोय होत असल्याने मौजे धेरंड व मौजे मानकुळे या ठिकाणच्या पडझड झालेल्या जेट्टींची दुरुस्ती करण्याचे काम सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात होती घेण्यात येणार असून त्या अनुषंगाने सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

-----------------

## अहमदनगर महानगरपालिकेतील वसुली लिपिकाला लाच स्विकारताना पकडल्याबाबत

**(८५) * ८६५७८ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर येथे खरेदी केलेल्या भूखंडाची गुंठेवारीप्रमाणे बिगर शेतीची नोंद करुन देण्यासाठी तक्रारदाराकडून २४ हजार रुपयांची लाच स्विकारताना अहमदनगर महानगरपालिकेतील वसुली लिपिक अनिल लोंढे यांस दिनांक १४ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या प्रकरणाची विभागीय चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषी लिपिकाविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अहमदनगर महानगरपालिकेतील वसुली लिपिक यांना दि.१४ जून, २०१७ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लाच स्विकारताना पकडले ही वस्तुस्थिती आहे.
(२) व (३) अहमदनगर महानगरपालिकेने दि.२२.०६.२०१७ च्या आदेशान्वये, श्री.लोंढे यांना दि.१४.०६.२०१७ पासून निलंबित केले असून, त्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

तसेच, याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील गोरेगाव-मालाड परीसरातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेवर काही अज्ञात व्यक्तींनी हल्ला केल्याबाबत

**(८६) * ८५७३९ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई गोरेगाव मालाड परीसरातील जन. अरुणकुमार वैद्य मार्गावर असणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेवर काही अज्ञात व्यक्तिंनी हल्ला केल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत कुरार पोलीस स्टेशन मध्ये दिनांक ३१ मे, २०१७ रोजी एफ. आय. आर. दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरचे हल्लेखोर भारत विरोधी घोषणा देत असल्याबाबतची तक्रार दाखल झाली असून सदर हल्लेखोरांना पकडण्याबाबत शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हल्ला झाला हे खरे नाही,

तथापि, फिर्यादी व त्यांचे साथीदार हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते असुन, संघाची महापालिकेच्या रामलिला मैदानात नियमित कवायत झाल्यानंतर सदर ठिकाणी फिर्यादी व त्याचे साथीदार तेथे थ्रो बॉल खेळत असताना त्यांचा बॉल लागल्याने, या गुन्हयातील आरोपींनी हाताने, स्टंप, बॅट, काठी, झाडाच्या फांद्या व हत्यारानिशी मारहाण केली तसेच अश्लिल घोषणा व शिवीगाळ केली, हे खरे आहे.

(२) व (३) होय,

सदरहू प्रकरणी कुरार पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. १९२/१७ कलम १४३, १४४, १४७, १४८, १४९, ५०६(२), ३२६, ३२४, ३२३ भा.दं.वि सह ३७(१)(अ) १३५ मपोका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असुन सदर गुन्हयात हल्लेखोरांपैकी चार आरोपींना (पैकी दोन बालअपचारी) अटक करण्यात आलेली आहे. बालअपचारी यांना पालकांच्या स्वाधिन केले असून सज्ञान आरोपी जामिनावर आहे त्यांचेवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. प्रस्तुतचे प्रकरण तपासाधिन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंधेरी (पूर्व) (जि. मुंबई उपनगर) येथील मरोळ पोलीस वसाहतीतील इमारती धोकादायक झाल्याबाबत

**(८७) * ९३१६० श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (पूर्व) (जि. मुंबई उपनगर) येथील मरोळ पोलीस वसाहतीतील इमारती अतिशय जीर्ण झाल्या असून इमारतीच्या लोखंडी सळ्या गंजून अतिशय कमकुवत झाल्यामुळे छताचे सिमेंट कॉंक्रेट पडून पोलीस कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय जखमी होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारती अतिशय धोकादायक झाल्या असून त्या दुरुस्त करण्याऐवजी तोडून बांधण्यात याव्यात अशा प्रकारचा अहवाल सदर इमारतीचे संरचनात्मक परीक्षण केल्यानंतर प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून इमारतीचे संरचनात्मक परीक्षण करून ४५ इमारतींच्या दुरुस्तीकरिता ४८. ५१ कोटी रूपये इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध होण्यासाठी गृहखात्याकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गृहखात्याने सदर प्रस्ताव व निधीकरीता शासनाकडे मंजुरी मागूनही शासनाने अद्याप मंजुरी दिली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, दुर्घटना होऊन पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांची जीवित व वित्तहानी होऊ नये याकरीता व मरोळ पोलीस कॅम्पात टाईप-२ प्रकारच्या ४४८ सदनिका नव्याने बांधण्याच्या कामास सुरुवात करण्यास शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३), (४) व (५)

दिनांक २७.०३.२०१७ रोजीच्या ज्ञापनाद्वारे एकूण आठ इमारतींची संरचनात्मक दुरुस्ती करण्यास रु.७,०५,६४,३५७/- इतक्या खर्चाच्या अंदाजास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून रु.५,३०,३९,०६३/- इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच, दिनांक ०३.०८.२०१७ रोजीच्या ज्ञापनाद्वारे उर्वरित एकूण ३७ इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती करण्यास रु.४२,६३,०९,३५६/- इतक्या खर्चाच्या अंदाजास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

तसेच, प्रकार-२ च्या ४४८ सदनिकांच्या प्रकल्पाचे नियोजन करण्याकरीता महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांनी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार याची नेमणूक केली आहे. या प्रकल्पाचे नकाशे मंजुरीकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेस सादर करण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लोअर परळ व वरळी येथील म्हाडाच्या ताब्यातील गिरण्यांच्या जमिनीबाबत

**(८८) * ८५६२७ श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली ५८(१)(ब) नुसार म्हाडास प्राप्त झालेल्या लोअर परेल, मुंबई येथील मातुल्य, मफतलाल मिल नं. ३ व वरळी येथील व्हिक्टोरिया मिल या गिरण्यांच्या भूखंडाचा आकार (क्षेत्रफळ) लहान असल्याने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हिश्याच्या भूखंडाबरोबर अदलाबदल करण्याच्या प्रस्तावास नगरविकास विभागाच्या दिनांक १७ मार्च, २०१५ रोजीच्या अधिसुचनेन्वये मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावानुसार अदलाबदल करण्यात आलेल्या भूखंडाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) असल्यास,सदरहू भूखंडावर गिरणी कामगारांसाठी सदनिका बांधण्याच्या कामाची सद्यस्थिती काय आहे,

(४) असल्यास,सदरहू सदनिकांचे बांधकाम किती कालावधीत पूर्ण करण्याचे शासनाचे नियोजन आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) व (२) सुधारित विकास नियंत्रण नियमावली ५८ (१) (ब) अंतर्गत आकारमानाने लहान असलेल्या मफतलाल मिल (ना.म.जोशी मार्ग), मातुल्य मिल (लोअर परळ), हिंदुस्थान मिल युनिट अ व ब (भायखळा, जेकब सर्कल) व्हिक्टोरिया मिल (लोअर परळ), हिंदुस्थान मिल / क्राऊन मिल (प्रभादेवी) व एम.एस.टी.सी. (फ्री होल्ड) (काळाचौकी) या सहा गिरण्यांच्या भूखंडाचा ताबा म्हाडास प्राप्त झाला आहे. तथापि, सदरहू भूखंड आकाराने लहान असल्याने तेथे गृहनिर्माण योजना राबविणे शक्य नव्हते. म्हाडास प्राप्त झालेल्या ६ गिरण्यांची एकूण क्षेत्रफळ ३८७३.८१ चौ.मी. इतके असून सदरहू ६ गिरण्यांच्या बदल्यात वेस्टर्न इंडीया मिल येथील महानगरपालिकेस प्राप्त झालेला मोकळ्या मैदानाचा भूखंड ३६०७.८३ चौ. मी. इतक्या क्षेत्रफळाचा आहे. सदरहू भूखंड म्हाडास प्राप्त झालेल्या ६ भूखंडाच्या

बदल्यात मुंबई महानगरपालिकेस अदलाबदल करण्याचे नगर विकास विभागास प्रस्तावित केले होते. सदर प्रस्तावास नगर विकास विभागाने दि. १७.०३.२०१५ रोजीच्या अधिसूचनेन्वये मान्यता दिलेली आहे.

(३) व (४) म्हाडामार्फत दि. २१.०७.२०१५ रोजी मुंबई महानगरपालिकेकडे अदलाबदलीचा प्रस्ताव पाठविला असून त्यास अद्‌याप मुंबई महानगरपालिकेची मान्यता प्राप्त झालेली नाही. मुंबई महानगरपालिकेची मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर योजनेचे काम त्वरीत हाती घेण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.